MAHMARI 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष पंचविसावे/अंक ७/जुलै २०२४

## संपादकीय

### आषाढस्य प्रथम दिवसे

'आषाढस्य प्रथम दिवसे' याचा अर्थ आषाढ महिन्याचा पहिला दिवस. चैत्र महिन्यापासून सुरू होणाऱ्या भारतीय कालगणनेनुसार आषाढ हा चवथा महिना होय. या महिन्यात पाऊस सुरू झालेला असतो. उन्हाने लाही लाही झालेल्या शरीराला पावसाच्या शिडकाव्याने गारवा प्राप्त झालेला असतो. उन्हाने वाळलेली माती पावसाने ओली होते. शेतीत पेरणी सुरू होते. आकाशात ढग दाटून येतात. मधून मधून इंद्रधनुष्याचे दर्शन होते. त्यामुळे आषाढ महिन्याचे आकर्षण काही औरच असते.

भारतात अनेक कवी आणि लेखक होऊन गेले. त्यामध्ये महाकवी कालिदास यांचे नाव फार वरचे आहे. कालिदासाची ग्रंथसंपदा प्रचंड आहे. त्यांनी ऋतूसंहार, कुमार संभवम, रघुवंशम, मेघदूत अशी महाकाव्ये लिहिली आहेत. त्यांनी लिहिलेल्या मेघदूत या ग्रंथाच्या सुरुवातीच्या भागात खालील श्लोक आढळतो.

कतिचिदबलाविप्रयुक्तः स का तस्मिन्नद्रौ मी
नीत्वा मासान्कनकवलयभ्रंशरिक्तप्रकोष्ठः।
आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुं।
वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श।।

या श्लोकाचे कुसुमाग्रज या सिद्धहस्त कवीने खालील प्रमाणे मराठीत रूपांतर केले आहे.

कृश हातातून गळून पडले सोन्याचे कंकण
कामातुर हो हृदय-कामिनी, दूर राहिली पण
आषाढाच्या प्रथम दिनी त्या दिसे पर्वतापरी
नयनरम्य घन, करी कड्यांवर गज वा क्रीडांगण!

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

हा धागा पकडून आषाढ शुद्ध प्रतिपदेला म्हणजेच आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी 'महाकवी कालिदास दिवस' साजरा करण्यात येतो. हा दिवस या वर्षी शनिवार दिनांक ६ जुलै रोजी साजरा करण्यात आला. नागपूर परिसरातील लोकांनी रामटेक जवळच्या रामगिरी पर्वतावरील कालिदास स्मारकाला भेट देऊन या महाकवीला श्रद्धांजली वाहिली.

मेघदूत हे काव्य इ.स.चे ४ ते ६ व्या शतकात लिहिले गेल्याचे मानले जाते. हद्दपारीची शिक्षा भोगणारा यक्ष, वर्षा ऋतू सुरू झाल्यावर अत्यंत व्याकुळतेने आणि उत्कटतेने, मेघालाच आपला दूत मानून, हिमालयातील अलका नगरीतील आपल्या पत्नीला संदेश पाठवितो. कालिदास हा यक्षाच्या तोंडून, रामटेकच्या रामगिरी पर्वतापासून ते हिमालयापर्यंतच्या मार्गाचे अत्यंत सुंदर वर्णन करतात. मेघदूत हे एक अत्यंत उत्कृष्ट 'संदेश काव्य' म्हणून जगभर गाजले. कवी, लेखक, नाटककार, अभिनेते, नर्तक, चित्रकार अशा अनेकविध कलांच्या अनेक कलाकारांना ते स्फूर्ती देणारे ठरले. यावर शेकडो भाष्यग्रंथ लिहिले गेले. त्यात सर्वाधिक गाजलेला भाष्यग्रंथ मल्लिनाथ या लेखकाने लिहिला होता. त्यावरून एखाद्या गोष्टीवरील उत्तम भाष्याला 'मल्लीनाथी' म्हटले जाते. मेघदूत या काव्याची अनेक भाषांमध्ये भाषांतरे करण्यात आली. हे मूळ काव्य मंदाक्रांता वृत्तातील आहे. होरॅस हेमन विल्सन यांनी १८१३ मध्ये मेघदूताचे इंग्रजीत पहिल्यांदा भाषांतर केले. त्यानंतर या काव्याचा पाश्चिमात्य देशात प्रसार झाला. तिथे या काव्याला उत्तम प्रतिसाद मिळाला.


महाकवी कालिदासाने आपल्या मेघदूत या जगप्रसिद्ध काव्यामध्ये, नागपूरपासून हिमालयापर्यंतच्या हवाईमार्गाचे सुंदर वर्णन केले आहे. 'एक सुंदर कल्पनाविलास' म्हणून वाचकांनी या वर्णनाचा आस्वाद घेतला. पुण्याच्या डॉ. सुरेश विश्वनाथ भावे यांनी मात्र या मार्गाचे निरीक्षण करायचे ठरविले. महाकवी कालिदास यांनी मेघदूतामध्ये वर्णन केलेल्या, नागपूरपासून हिमालयापर्यंतच्या हवाईमार्गाने डॉ. भावे यांनी विमानातून भ्रमण केले. निरीक्षणे नोंदविली. या मार्गाचे संपूर्ण छायाचित्रण त्यांनी केले. हे काम अत्यंत जिकिरीचे होते. कारण पावसाळा सुरू झाल्यानंतर हे काम करावे लागले. आपली निरीक्षणे त्यांनी सविस्तरपणे नोंदवून ठेवली. या निरीक्षणांची कालिदासाने केलेल्या वर्णनाशी तुलना केली तर ते तंतोतंत जुळतात असे लक्षात येते. कालिदासानी नक्कीच विमान प्रवास केला नव्हता. तरीही एवढे सविस्तर वर्णन ते कसे करू शकले याचे आश्चर्य वाटते!

महाराष्ट्राच्या दृष्टीने आषाढ महिन्याचे आणखी एक महत्त्व आहे. ते म्हणजे 'पंढरीची वारी'. दरवर्षी आषाढ महिन्यात विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो भाविक पंढरपूरला जातात. तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर, या महान संतांच्या पालख्या निघतात. त्यात हजारो भाविक सहभागी होतात. याखेरीज अनेक लोक लहान लहान गटाने प्रवास करतात. या सगळ्यांची सोय वाटेत येणाऱ्या गावातील गावकरी करतात. अनेक स्वयंसेवी संघटना औषध-पाण्याची सोय करतात. मानवी सहकार्याचे हे उत्तम उदाहरण आहे. याचा अभ्यास करण्यासाठी परदेशांतून अनेक अभ्यासक येत असतात. यांचे कारण अशा प्रकारची वारी जगात कुठेही आयोजित केली जात नाही. १२ व्या शतकात सुरू झालेले हे कार्य अजूनही अव्याहतपणे सुरू आहे. याला तोड नाही. एकदातरी आषाढात या वारीत सहभागी होऊन प्रत्यक्ष अनुभव घेण्याची गरज आहे. तेव्हाच भाविकांच्या मनाचा थांगपत्ता लागेल!

**– डॉ. सुधाकर आगरकर**

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष पंचविसावे/अंक ७/जुलै २०२४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २९ वे/अंक १ ला)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*


| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) सरस्वती नदीचे गूढ ! | श्री शैलेंद्र कवाडे | २ |
| ३) कोल वाशिंग | दिलीप नारायण वंडलकर | ४ |
| ४) लाखात एक : शांभवी | नरेंद्र गोळे | ५ |
| ५) ब्रिटनच्या इस्लामीकरणाचा धक्कादायक प्रवास : अमंग द मॉस्क्स | हेरंब ओक | ८ |
| ६) उंटांची अदभूत रम्य दुनिया २०२४ हे आंतराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | १४ |
| ७) फ्रॅन्झ काफ्का... | जयंत कुलकर्णी | १७ |
| ८) ओरिसाच्या रथ यात्रेची कहाणी | रवी वाळेकर | २५ |
| ९) परिसर वार्ता | संकलित | ३० |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# सरस्वती नदीचे गूढ !


*जागतिक पर्यावरण दिन दिनांक ५ जून रोजी साजरा झाला. त्यानिमित्ताने सरस्वती नदीच्या लुप्त झालेल्या प्रवाहावर प्रकाश टाकणारा शैलेंद्र कवाडे यांचा लेख - संपादक*

आज मला आपल्या संस्कृतीत घडलेल्या सगळ्यात मोठ्या 'पर्यावरणीय अपघाताची' आठवण आली, त्या अपघाताची गोष्ट परत आठवली.

ही एका सुकलेल्या आणि तरीही स्मृतीत जिवंत राहिलेल्या नदीची गोष्ट आहे, पण फक्त नदीची नाही, ही एका संस्कृतीची हरवून परत सापडत जाण्याची गोष्ट आहे. वरवर लुप्त होऊन 'आतून वाहात राहण्याची' गोष्ट आहे.

ही गोष्ट आहे सरस्वतीची.. ही गोष्ट आहे तिच्या काठावर फुललेल्या, बहरलेल्या आपल्या संस्कृतीची. ही गोष्ट आहे आपला इतिहास, आपला भूगोल आणि आपले पर्यावरण हजारो वर्षं मौखिक परंपरेतून जतन करणाऱ्या आपल्या पूर्वजांची..

आपल्या संस्कृतीचा ज्ञात असलेला सगळ्यात पहिला शब्द म्हणजे 'ऋग्वेद'. ऋग्वेद सरस्वतीला




'नदीतमा' म्हणतो. ऋग्वेद सरस्वतीला 'सप्तसिंधूची जननी' मानतो. एखादा खंड सोडल्यास ऋग्वेदाच्या प्रत्येक खंडात सरस्वतीचा उल्लेख आहे. ही नदी कशी होती तेच नुसते ऋग्वेद सांगत नाही, तर तिच्या काठावरचा प्रदेश कसा होता तेही ऋग्वेद वर्णन करून सांगतो. संपूर्ण ऋग्वेदात फक्त सरस्वतीसाठी पूर्ण श्लोक रचले गेले आहेत, सरस्वतीचा महिमा वारंवार गायला गेला आहे. हे भाग्य ना गंगेला आहे, ना सिंधूला..

कारण ह्या संस्कृतीचा जन्मच सरस्वतीच्या पोटात झाला होता, तिचे पोषण सरस्वतीच्या काठावर झाले होते. दाशरज्ञ युद्धासारख्या ऐतिहासिक घटना तिच्या खोऱ्यात घडल्या होत्या. आज आपण जिला सिंधू संस्कृती म्हणतो, ती सरस्वती संस्कृती होती, सिंधू नदीच्या काठी आज सापडलेली शहरे हा सरस्वतीच्या संस्कृतीचा विस्तार होता. पश्चिमेला सिंधू ते पूर्वेला गंगेपर्यंत गवसत जाणारा प्राचीन नागरी अवशेषांचा हा पसारा ज्याला आपण पूर्वी 'वैदिक संस्कृती' म्हणायचो, त्याचा पूर्ण पट होता.

सरस्वती कुठे आहे हे नदीसुक्तात ऋग्वेदाने स्पष्ट सांगितले आहे,-

इमं मे गंगे यमुने सरस्वति शुतुद्रि स्तोमै सचता परूष्ण्या।

असिवक्न्या मरूद्वृधे वितस्तयार्जीकीये श्रणुह्या सुषोमया।।

ह्या नद्यांचे वर्णन पूर्वेकडून पश्चिमेकडे केले आहे. पहिली गंगा, मग यमुना, मग सरस्वती, त्यानंतर सतलज, मग पुढच्या..

परमेश्वराची कृपा होते; पण, श्रद्धा आणि सबुरी हे दोन गुण असतील तेव्हाच!

सरस्वतीचे उल्लेख फक्त ऋग्वेदात नाहीत, ते रामायणात आहेत, महाभारतात आहेत आणि नंतर रचल्या गेलेल्या ब्राह्मणांत देखील आहेत. ऋग्वेद सरस्वतीचा उल्लेख सुरवातीला 'नदीतमा' म्हणून करतो, पण दहाव्या खंडात नदीसुक्तातच ऋग्वेद म्हणतो की, 'सिंधू ही सगळ्यात मोठी नदी आहे.' रामायण म्हणते की, 'सरस्वती हळूहळू सुकते आहे, लहान होते आहे.' महाभारत म्हणते, 'सरस्वती कधीतरीच वाहते, कधी कधी सुकून जाते.' सरस्वती जिथे लुप्त होते त्या जागेला व्यास 'विनशन' असे म्हणतात. नंतर रचल्या गेलेल्या ब्राह्मणांनी तर सरस्वतीला सरळ 'विद्येची देवता' केले, 'वेदवती' म्हटले, जिवंत संस्कृतीच्या सुकलेल्या जन्मदात्रीला त्यांनी देवीचा मान देऊन जिवंत ठेवले.

हा सगळा आपल्या भूगोलाचा इतिहास आहे, जो आपल्या पूर्वजांनी लिहून ठेवलाय.

काय झालं होतं तेंव्हा?

विष्णू श्रीधर वाकणकर नावाचे फार श्रेष्ठ पुरातत्त्व संशोधक होते, ज्यांनी मध्य प्रदेशातील 'भीमबेटका' गुहांचा शोध लावला. त्यांनीच लावलेला अजून एक शोध तुलनेने कमी प्रसिद्ध आहे, तो आहे सुकलेल्या सरस्वतीचा.. 'सुकलेल्या सरस्वती'च्या शोधात वाकणकर सरांनी तिच्या मुखापासून ते उगमापर्यंतचा भाग पिंजून काढला.

आज ज्याला आपण कच्छचे रण म्हणतो तो एकेकाळी सरस्वती समुद्राला मिळण्याचा त्रिभुज प्रदेश होता, जसे आज 'सुंदरबन' आहे तसा. म्हणूनच धोलवीरासारख्या नागरी वस्त्या तिथे होत्या. आज ज्याला आपण राजपुताना म्हणतो तो सरस्वतीच्या खोऱ्यातील सुपीक भाग होता. आजचा हरियाणा आणि कुरुक्षेत्राच्या आसपासचा भाग हा सरस्वतीच्या पाण्यावर पोसलेला अत्यंत संपन्न प्रदेश होता. आज जिला 'घग्गर' म्हणून ओळखले जाते ती सरस्वतीची एक उपनदी होती. यमुना आणि सतलज ह्या दोन्ही नद्या आपले पाणी सरस्वतीच्या प्रवाहात ओतत होत्या. सरस्वती लाखो वर्षं अशीच वाहत होती. आपल्या दोन्ही काठांवर संस्कृती फुलवत होती.

पण नंतर काहीतरी झालं, कोणतीतरी भौगोलिक घटना घडली आणि यमुनेचा प्रवाह पूर्वेकडे वळला. परत काहीतरी झालं आणि सतलजचा प्रवाह पश्चिमेला सरकला. यमुना गंगेला मिळाली आणि सतलज सिंधूला मिळाली. सरस्वती सुकत गेली, कोरडी पडत गेली. सरस्वतीच्या काठावर नांदणारी काही लोकं गंगेकडे गेली, काही सिंधूकडे गेली. ह्यानंतर हजारो वर्षांनी लिहिलेल्या 'बौधायन श्रौत सूत्रात' ह्या विस्थापनाचा स्पष्ट उल्लेख आढळतो.

सरस्वती आटली. तिच्या काठचा सुपीक प्रदेश वाळवंटात बदलला. ह्यात तिच्या काठी राहणाऱ्या लोकांचा काहीच दोष नव्हता. ते लोक, त्या संस्कृती पांगल्या. आईच्या कुशीतून मावशीच्या पदराखाली जावं तशा गंगा आणि सिंधूच्या आश्रयाला गेल्या. मग नर्मदा आणि गोदावरीच्या, कावेरी आणि तुंगभद्रेच्या काठावरही फुलल्या, मोठ्या झाल्या. स्वतःला कधी 'भारत' तर कधी 'हिंदुस्थान' म्हणवून घेऊ लागल्या.

पण त्या संस्कृती, ती लोकं सरस्वतीला विसरली नाहीत. सरस्वती त्यांच्या ज्ञानाची, कलेची, विद्येची देवता झाली, सरस्वतीच्या पाण्याचा नाद विणेच्या आवाजात निनादत राहिला. कधी शब्दांच्या, कधी शाईच्या माध्यमातून वाहात राहिला.

सुकलेली सरस्वती भारतीयांच्या रक्तातून जिवंत राहिली!..

**– श्री शैलेंद्र कवाडे**

ज्येष्ठ संशोधक

पुणे

●●●

# कोल वाशिंग

*टेक्नॉलॉजीच्या नावीन्यपूर्ण शोधामुळे कमी प्रतीचा दगडी कोळसा वीज तयार करण्यासाठी उपयुक्त ठरत असला तरी कांही जुन्या औष्णिक विद्युत केंद्रातील संचात त्याचा वापर योग्य ठरत नाही. त्यांना आवश्यक असलेल्या प्रतीचा कोळसा 'कोल वाशिंग' ही प्रक्रिया राबवून उपलब्ध करून देण्यात येतो. त्याचीच माहिती या लेखात दिलेली आहे. - संपादक*

सत्तरच्या दशकात नॉन-कोकींग कोळशात राख आणि ओलाव्याचे एकंदर प्रमाण १९, २४, २८, ३३, ३९ पर्यंत असलेल्या कोळशाला अनुक्रमे ए, बी, सी, डी, अनग्रेडेबल आणि त्यानंतर नॉन-व्हेंडेबल असे वर्गीकरण करण्यात येत असे. ए आणि बी ग्रेडचा कोळसा रेल्वे आणि जहाजांमध्ये तर सी आणि डी प्रतीचा कोळसा सिमेंट, वीज व इतर ठिकाणी उपयोगात आणला जाई. संयंत्रांची जडणघडणही त्यानुसारच असे. अशाप्रकारचा कोळसा मुख्यतः भूमिगत खाणीतून काढण्यात येई. मात्र, या प्रकारात सुरक्षेच्या कारणास्तव फक्त २ टक्के कोळसाच काढण्यात यायचा.

हळूहळू विजेची आणि सिमेंटची मागणी वाढू लागली. दोन मेगा वॅट पासून सुरुवात झालेली काळानुरूप ११०, १५०, २१०, २५०, ३५०, ५०० आणि आता ६०० मेवॅट वीज उत्पादन करणारी संयंत्रे वीज मंडळांच्या भात्यात आली आहेत. अर्थात ही संयंत्रे जास्त राखेचे प्रमाण असलेल्या कोळशाच्या उपयोजितेवर आधारित होती. तेव्हा १९, २४, २८, ३३, ३९, ४५, ५२ टक्के राख आणि ओलाव्याचे प्रमाण असलेल्या कोळशाचे अनुक्रमे ए, बी, सी, डी, ई, एफ, जी असे वाढीव वर्गीकरण करण्यात आले. मोठ्या प्रमाणावर लागणाऱ्या कोळशाचा पुरवठा करण्यासाठी खुल्या खाणी सुरू करण्यात आल्या. या खाणीतून १०० टक्के कोळशाचे उत्पादन शक्य होते.

हे सर्व होत असताना निघणाऱ्या राखेचे प्रमाण जास्त असल्याने त्याचा त्रास आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना होऊ लागला. त्यातच २१० मे. वॅटची संयंत्रे ३३ टक्के राख आणि ओलावा असलेल्या कोळशासाठी उपयुक्त होती. त्यामुळे या क्षमतेच्या संयंत्रांना केंद्रीय प्रदूषण मंडळाने ३३ टक्क्यापेक्षा जास्त राख असलेल्या कोळशाला वापरासाठी बंधन घातले. हे प्रमाण राखण्यासाठी कोल वाशिंग ही संकल्पना पुढे आली. या आधी ही बाब स्टील उद्योगांना लागणाऱ्या कोकींग कोलसाठी प्रचलीत होतीच. यात मीडियम कोकींग कोलला 'वॉश' करून त्यातील राखेचे प्रमाण १६ टक्के पर्यंत नियंत्रित करून मगच तो स्टील उद्योगांना पाठविण्यात येतो.

हीच संकल्पना सध्या नॉन-कोकींग कोलसाठी राबविण्यात येत आहे. यात खाणीतून निघणाऱ्या कोळशाला 'कोळसा हाताळणी प्रकल्प' मध्ये वेगवेगळ्या

(पृष्ठ क्र.७ वर)



कोल वॉशरी, वराडा, तहसील - पारशिवनी, जिल्हा - नागपूर

# लाखात एक : शांभवी

*शपथ तोंडपाठक घेणाऱ्या आणि २५ वर्ष वयाच्या शांभवींविषयी पंतप्रधान मोदीजींनी, दरभंगा येथील प्रचारसभेत, ''भारत की सबसे छोटी बेटी... उसीको जरूर जिताना'' असे केलेले आवाहन! ही शांभवी कोण? ही उत्सुकता काही अंशाने पूर्ण होईल. – संपादक*

लोकसभा–२०२४ निवडणुका नुकत्याच पार पडल्या. भारताची एकूण अनुमानित लोकसंख्या बुधवार २६–०६–२०२४ रोजी १,४४,१५,१७,५६५ एवढी आहे. याकरता ५४३ लोकसभा मतदारसंघ आहेत. त्यामुळे दर लोकसभा मतदारसंघात अनुमानित २६,५४,७२८ लोक राहत असतात. त्यामुळे लोकसभा मतदारसंघातून निवडून येणारा प्रतिनिधी सुमारे २५ लाख लोकांचे प्रतिनिधित्व करत असतो. तो अक्षरशः लाखांत एक असतो. तो नेतृत्व करत असतो. त्यांतील बहुसंख्यांनी त्याचा नेता म्हणून स्वीकार केलेला असतो. तो कसा आहे यावर आपल्या भारताचा भविष्यकाळ अवलंबून असतो म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. अशा प्रतिनिधींतही जुने जाणते लोक बरेच असतात. ते काही यापुढे फार काळ नेतृत्व देऊ शकतील अशी स्थिती नसते. जितके अधिक तरुण असतील तितकेच ते अधिक काळ देशास नेतृत्व देऊ शकतात. मात्र लोकसभेच्या प्रतिनिधित्वाकरता पात्रतेचे वयच, किमान २५ वर्षे असे आहे. त्यामुळे २५ वर्षे वयाचा जर एखादा प्रतिनिधी असेल तर त्याचेकडून आपण अधिक काळ नेतृत्वाची अपेक्षा करू शकतो.

लोकसभा–२०२४ निवडणुकांत आपण १८–व्या लोकसभेची निवड केली. आज आपल्याला त्या सर्व ५४३ लोकप्रतिनिधींची सूची[१] उपलब्ध आहे. बिहारमधील समस्तीपूर मतदार संघातून लोक जनशक्ती पक्षातर्फे १८–व्या लोकसभेत निवडून आलेल्या श्रीमती शांभवी चौधरी या, या लोकसभेतील सर्वात तरुण संसदपटू ठरल्या आहेत. त्यांचे वय केवळ २५ वर्षे आहे. काल २५–०६–२०२४ मंगळवार रोजी त्यांनी खासदारपदाची शपथ घेतली[२]. हिंदीतील संपूर्ण शपथ त्यांना मुखोद्गद होती. तोंडपाठ, अस्खलितपणे, स्पष्ट शब्दोच्चारांसह त्यांनी ती घेतली. तो प्रसंग सोबतच्या दूरचित्रणात प्रत्यक्षच पाहण्यासारखा आहे. दोन दिवस चाललेला शपथविधी समारंभ मी जवळपास संपूर्ण पाहिला. त्यांच्यासारखी तोंडपाठ शपथ इतर कुणीही घेतली नाही.

त्यामुळे २५ वर्षे वयाच्या श्रीमती शांभवी चौधरी देशातल्या सर्वात तरुण महिला खासदार झालेल्या आहेत. लोक जनशक्ती पक्षाकडून २०२४ च्या लोकसभा निवडणुकांत बिहारमधील समस्तीपूर येथून त्या निवडून आलेल्या आहेत. १ लाख ८७ हजारांहून अधिक मतांनी आपले प्रतिस्पर्धी काँग्रेसचे सन्नी हजारी यांचा पराभव केलेला आहे. हे मताधिक्य संपूर्ण भारतात दुसऱ्या क्रमांकाचे आहे. प्रथम क्रमांक अर्थातच आपले विरोधी पक्ष नेते श्रीमान राहुल गांधी यांचा आहे. त्यांचे रायबरेली मतदारसंघातील मताधिक्य ३ लाख ९० हजारांचे आहे. निवडून आल्यावर 'संसद टीव्ही' चॅनेलने

[१] १८–व्या लोकसभेतील नवनिर्वाचित खासदारांची सूची https://sansad.in/ls/members

[२] १८–व्या लोकसभेत शपथ घेताना शांभवी https://www.youtube.com/shorts/23nIšOfLQwE

शांभवी यांची एक मुलाखत[३] घेतली. त्यात त्यांनी आपल्या मतदारसंघाच्या भावी विकासाच्या संकल्पना चर्चिलेल्या आहेत. मुलाखत मुळातच पाहिली तर त्यातून भारतातील एका भावी समर्थ नेतृत्वाचे दर्शन घडते.

शांभवी या, बिहारचे मंत्री अशोक चौधरी यांच्या कन्या असून, पूर्व आय.पी.एस. अधिकारी आणि समाजसुधारक आचार्य किशोर कुणाल यांच्या स्नुषा आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दरभंगा येथील प्रचारसभेत ''भारत की सबसे छोटी बेटी, यहाँ से चुनाव लड रही है, जरूर जिताना'' अशा शब्दांत त्यांची शिफारस केली होती.

त्यांनी 'दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या प्रतिष्ठित संस्थेतून सोशलॉजी विषयात एम.ए. पदवी प्राप्त केलेली आहे.



त्या म्हणतात– ''कोणताही बाप मुलीला निवडणुकीत विजय मिळवून देऊ शकत नाही. त्याकरता मलाच काम केले पाहिजे. समस्तीपूरचे लोकच ठरवतील त्यांचे प्रतिनिधित्व कोण करेल ते. माझे कुटुंबीय काही ते ठरवणार नाहीत. मला त्या लोकशाही प्रक्रियेचा हिस्सा झाले पाहिजे, जी लोकांकरता आहे, लोकांनीच तयार केलेली आहे आणि जी लोकांचीच आहे. राजकारण आणि समाज समजून घेणे माझ्याकरता काही अवघड नाही. राजकारणात येणे म्हणजे, ज्याचा मी केवळ अभ्यास केलेला आहे, त्या गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव मिळवणे. माझी शैक्षणिक पूर्वपीठिका, या क्षेत्रातल्या अडचणी समजून घेण्यास मला नक्कीच उपयोगी पडेल. लवकरात लवकर त्यांचे समाधान शोधण्याचा मी भरकस प्रयास करेन.''

''युवा नेत्यांपाशी एक विचार असतो. नवीन विचारसरणी असते. ते नव्या पद्धतीने काम करतात. त्याशिवाय आमच्यापाशी मोदी होते. मोदी पुन्हा पंतप्रधान व्हावेत अशी बहुसंख्य लोकांची इच्छा होती. आमच्यासोबत आमचे मुख्यमंत्री नितीशकुमारही होते. त्यांच्या प्रशासनावर समस्तीपूरच्या लोकांचा विश्वास आहे. समस्तीपूरमध्ये पुरेशी दळणवळणाची साधने नाहीत. ती उपलब्ध व्हावीत. इथल्या लोकांच्या आकांक्षांची पूर्तता करू शकेल एवढ्या सोयी उपलब्ध व्हायला हव्यात. इथे पावसाळ्यात पूर येतात. लोक इकडून तिकडे जाऊही शकत नाहीत. त्या अडचणी दूर व्हाव्यात. इथे मका आणि ऊस यांची शेती खूप आहे. कृषीवर आधारित उद्योग इथे निर्माण व्हायला हवे आहेत. इथल्या समाजाचा आर्थिक विकासही व्हायला हवा आहे. स्त्रियांकरता नव्या शैक्षणिक सुविधा निर्माण व्हायला हव्या आहेत. माझ्या मनात आहे की, इथे स्त्रियांकरता पॉलिटेक्निक निर्माण व्हावे. पदवी कॉलेज निर्माण व्हावे. असे सर्व विकास इथे घडवून आणण्याकरता मी कार्य करेन.''

निवडणुकीच्या राजकारणात सामाजिक माध्यमांची भूमिका किती शक्तिशाली आहे असे विचारले तेव्हा त्या म्हणाल्या की, ''निवडणुकीच्या राजकारणात सामाजिक माध्यमांना फारसे महत्त्व नसते. बहुसंख्य लोक सामाजिक संगणकीय माध्यमांशी संबंधितच नसतात. थेट संपर्कच त्याकरता कामी येतो. मात्र देशभरातील लोकांना तुमची व्यक्तिरेखा समजावी, हवी

[३] 'संसद टीव्ही' चॅनेलने घेतलेली शांभवी यांची मुलाखत https://sansadtv.nic.in/episode/newly-elected-mp-of-18th-lok-sabha-shambhavi-chowdhry-talks-to-sansad-tv-13-june-2024

त्याला हवी तेव्हा ती उपलब्ध व्हावी, याकरता सामाजिक संगणकीय माध्यमे उपयुक्त ठरतात.''

महिला म्हणून युवा म्हणून काम करताना तुम्हाला निवडणुकीच्या प्रचारात कोणता फरक जाणवला? असा प्रश्न विचारला असता त्या म्हणाल्या की, ''माझ्या मतदारसंघातली मी पहिली संसदपटू आहे. यापूर्वीच्या सांसदांनी प्रचार कसा केला असेल याचा विचार करता असे लक्षात आले की, ते घरोघर जात असत, पुरुषांना भेटत असत आणि निघून जात असत. घरातील स्त्रियांपर्यंत ते पोहोचूच शकत नसत. पोहोचत नसत. मी जेव्हा प्रचाराकरता जाई, तेव्हा लोक मला आपल्या घरातील स्त्रियांशी, मुलींशी ओळख करून देत. मला त्यांच्याशी बोलण्याची संधी मिळे. त्यांच्या अडीअडचणी समजून घेता येत. त्यांच्या आशाआकांक्षा माहीत करून घेता येत. या माहितीचा मला भविष्यात खूप उपयोग होईल. त्यांच्या आशाआकांक्षा पूर्ण व्हाव्यात याकरता मी प्रयत्न करू शकेन.''

देशासमोरच्या मुख्य समस्यांवर बोलण्याची संधी मिळेल तेव्हा कदाचित त्या, त्यावरील त्यांची मतेही सांगतील. मात्र ज्यांचे आपण प्रतिनिधित्व करतो, त्यांच्या आशाआकांक्षांचे प्रतिबिंब आपल्या प्रयासांत पडायला हवे, ही त्यांची भूमिका मला कौतुकास्पद वाटली. यथार्थ वाटली. या निवडणुकीतील त्यांच्या यशासारखेच, त्यांचे संसदेतील कार्यही देदिप्यमान होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

मात्र जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीच्या, सर्वात बहुचर्चित निवडणुकांच्या जगडव्याळ शोधातून, जी रत्ने आपल्या हाती आलेली आहेत, त्यांची किमान जुजबी ओळख आपण करून घ्यायला हवी, असे यावेळी मला प्रकर्षाने वाटले. शिवाय महाजालावर सत्वर माहितीचा साठाही हल्ली उपलब्ध असतोच. त्याचा उपयोग करून, भारतातील सर्वांत तरुण नवनिर्वाचित संसदपटूची ओळख प्रस्थापित करण्याचा मी हा प्रयास केलेला आहे. मला आशा आहे की, हा अल्पपरिचय तुम्हालाही सुरस वाटेल.

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी, टिळकपथ
छेदगल्ली, टिळकनगर, डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

---

(पृष्ठ क्र.४ वरून – **कोल वाशिंग**)

चाळण्यातून नेतात. कोळसा जितका बारीक तेवढी त्याची गुणवत्ता कमी. या अनुषंगाने ज्याला 'वाशिंग' ची गरज आहे, त्याला 'कोल वाशिंग प्लांट' मध्ये आणून ३३ टक्क्यांपर्यंत कोळशातील राखेचे प्रमाण राखले जाते. यासाठी 'फ्लोट आणि सिंक' या प्रणालीचा वापर होतो. यात मॅग्नेटा आणि डि-मिनरलाईज्ड पाणी यांच्या १.६ ते १.७ घनता असलेल्या द्रावणातून कोळसा प्रवाहित केला जातो. जड कोळसा खाली आणि चांगला कोळसा वर तरंगतो. अशाप्रकारे, ३३ टक्के राखेचे प्रमाण असणारा कोळसा २१० मे. वॅट क्षमतेच्या संयंत्रांना, तर उरलेला जास्त राखेचे प्रमाण असणारा कोळसा ३५० पासून पुढील मे. वॅट क्षमतेच्या संयंत्रांना पाठविण्यात येतो. यातून वेगवेगळ्या क्षमता असलेल्या संयंत्रांना त्यांच्या गरजेनुसार कोळशाचा पुरवठा करणे कोल इंडियाला सुलभ झाले आणि वीज मंडळांना प्रदूषणावर नियंत्रण राखण्यासाठी मदत झाली.

**– दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
नागपूर – ४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ-मेल- wandalkardilipgmail.com

•••

---

# ब्रिटनच्या इस्लामीकरणाचा धक्कादायक प्रवास : अमंग द मॉस्क्स

*ब्रिटनच्या इस्लामीकरणाचा धक्कादायक प्रवास मांडणाऱ्या 'अमंग द मॉस्क्स' या पुस्तकाचे परीक्षण प्रस्तुत लेखात केले आहे- संपादक*

सातव्या शतकात सौदीत जन्माला आलेला इस्लाम, नंतरच्या काही शतकांतच वावटळीप्रमाणे जगभर पसरला. अमेरिका, आफ्रिका, युरोप, आशिया अशी सर्वत्र घोडदौड करत असलेल्या इस्लामचा गेल्या सुमारे १०० वर्षांतला प्रामुख्याने इंग्लंडमधला प्रवास आणि प्रभाव याचं वर्णन एड हुसेन या लेखकाच्या 'Among the Mosques: - Journey Across' Muslim Britain या पुस्तकात वाचायला मिळतं. जन्माने ब्रिटिश मुस्लिम असलेल्या लेखकाचे आईवडील हे बांग्लादेशी मुस्लिम आहेत. १९६१ मध्ये त्याचे आईवडील ब्रिटनमध्ये आले आणि तिथेच स्थायिक झाले. एड हुसेनचं हे इस्लामविषयक तिसरं पुस्तक असून The Islamist आणि The House of Islam या दोन पुस्तकांत त्याची पूर्वाश्रमीची जडणघडण, इस्लामकडे आकर्षित होणं, इस्लामचा अभ्यास याबद्दल तपशीलवार माहिती आहे. कालांतराने त्यातला फोलपणा कळून आल्यानंतर इस्लामचा ब्रिटनमधला प्रवास जाणून घेण्याच्या दृष्टीने केलेला प्रवास सद्य पुस्तकात पाहावयास मिळतो.

या पुस्तकाच्या लेखनासाठी लेखकाने युकेमधील महत्त्वाच्या मुस्लिमबहुल शहरांमधून प्रवास केला. तेथील सामान्य नागरिक, प्रमुख व्यक्ती, मौलवी, राजकारणी, टॅक्सी ड्रॉयव्हर अशा सर्व लोकांशी चर्चा करून, त्यांना प्रश्न विचारून, बोलतं करून त्यांच्या अनुभवांचं एकत्रीकरण करून इस्लामचा गेल्या साधारण १०० वर्षांमधला युकेमधला प्रवास शब्दबद्ध केला आणि 'अमंग द मॉस्क्स' या आपल्या पुस्तकातून वाचकांसमोर आणला. ब्लॅकबर्न, ब्रॅडफर्ड, बर्मिंगहम, बेलफस्ट (नॉर्दर्न आयर्लंड), एडिनबर्ग आणि ग्लास्गो (स्कॉटलंड) आणि लंडन या प्रमुख मुस्लीम बहुल शहरांमधील अनेक धक्कादायक अनुभव या पुस्तकात वाचायला मिळतात. या पुस्तकात त्या शहरांमधील आणि पर्यायाने ब्रिटनमधील मुस्लीम जीवन, त्यांच्या चालीरीती, कट्टरपणा, धर्मद्वेष्टेपणा या सगळ्याचे हादरवून सोडणारे अनुभव वाचायला मिळतात.

पुस्तकाच्या सुरुवातीलाच परिचयाच्या प्रकरणात लेखकाने ब्रिटन आणि तेथील मुस्लीम लोकसंख्येचा धक्कादायक विस्फोट याची सप्रमाण माहिती दिली आहे. सुमारे शंभर वर्षांपूर्वी फक्त दोन मशिदी असलेल्या इंग्लंडमध्ये आज किमान दोन हजार मशिदी आहेत. इंग्लंडमधील पहिली मशीद लिव्हरपूलमध्ये सन १८८९ साली उभारण्यात आली. इस्लाममध्ये धर्मपरिवर्तन केलेल्या २० ब्रिटिश मुस्लिमांनी तिची स्थापना केली होती. शंभर वर्षांपूर्वी फक्त दोन मशिदी असणाऱ्या इंग्लंडमधील लंडन, ल्युटन, बर्मिंगहम, ब्रॅडफर्ड, ड्यूसबरी, ब्लॅकबर्न, कीली, नेल्सन इत्यादी शहरांचं आकाश आता मशिदींचे घुमट, मिनार, मनोरे यांनी भरून गेलेलं आढळतं.

ऑफिस फॉर नॅशनल स्टॅटिस्टिकस (ONS) च्या अधिकृत आकडेवारीनुसार २००१ ते २०१६ या पंधरा वर्षांत संपूर्ण ब्रिटनची लोकसंख्या ४.९ कोटींवरून सुमारे ११ टक्क्यांनी वाढून ५.४ कोटींवर जाऊन पोचली. मात्र याच कालावधीत ब्रिटनची मुस्लीम लोकसंख्या मात्र पंधरा लाखांवरून थेट बत्तीस लाखांवर गेली. थोडक्यात १०७.३ टक्क्यांची अविश्वसनीय आणि धोकादायक वाढ !!! सन २०५० पर्यंत ब्रिटनची मुस्लीम

लोकसंख्या एक कोटी तीस लाखांच्या वर जाऊन पोचेल असा अंदाज आहे.

**ब्लॅकबर्न**

बर्मिंगहम, रॉशडेल, ब्रॅडफर्ड, कीली अशा अनेक शहरांमध्ये वर्षानुवर्षे स्थायिक झालेल्या पंजाबी आणि काश्मिरी मुसलमानांच्या हातात त्या शहरांची सर्व सत्ता एकवटलेली आहे. मतांच्या लाचारीपायी राजकारणी आणि स्थानिक नेतेही लाळघोटेपणा करत इथल्या काळ्या कृत्यांकडे दुर्लक्ष करतात.

लंडन, बर्मिंगहम, ब्लॅकबर्न ही ब्रिटनमधील सर्वाधिक मुस्लीम लोकसंख्या असलेली काही शहरं आहेत. लुईस कॅसी कमिशनने २०१६ साली केलेल्या एका सर्वेक्षणात ब्लॅकबर्नबद्दलचे धक्कादायक निष्कर्ष सामोरे आले. या सर्वेक्षणानुसार ब्रिटनमध्ये अल्पसंख्यांक असलेले लोक (मुस्लीम) प्रत्यक्षात ब्रिटनच्या अनेक शहरांच्या उपनगरांमध्ये बहुसंख्यांक झाले आहेत आणि त्यात ब्लॅकबर्नचा क्रमांक सर्वात वरचा आहे. ब्लॅकबर्नच्या बास्टवेल आणि शिअरब्रो प्रभागांत मुस्लीम लोकसंख्या अनुक्रमे ८५% आणि ७८% झाली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार ब्लॅकबर्नच्या एकूण एक लाख सतरा हजार लोकसंख्येमध्ये सुमारे पन्नास हजार लोकसंख्या मुस्लिमांची आहे. अजून एक महत्त्वाची आकडेवारी म्हणजे याच शहरात बेकारी ही ६% आहे जी ब्रिटनच्या राष्ट्रीय सरासरीच्या मानाने खूप अधिक आहे. आणि अर्थातच त्यामुळे गुन्हेगारी देखील आपोआपच खूप अधिक आहे. तिथे श्वेतवर्णीय लोकांवर रस्त्यांत उघडउघड हल्ले केले जातात. ब्लॅकबर्नमध्ये अनेक ठिकाणी मुस्लिमांव्यतिरिक्त अन्य लोकांना प्रवेश नाही. थोडक्यात ते No-Go Areas आहेत.

ब्लॅकबर्नमध्ये मशिदींवरच्या भोंग्यांना कुठलीही आडकाठी नाही परंतु श्वेतवर्णीय ब्रिटिश लोकांना मोठ्या आवाजात गाणी लावायला परवानगी नाही. इतकंच नव्हे तर, तेथील नागरिकांना त्यांच्या देशाचा युनियन जॅक फडकवण्याचीही परवानगी नाही. सरकार मुस्लिमांना वर्णद्वेषी, जातीयवादी वाटू नये म्हणून घेण्यात आलेली खबरदारी आहे ही !!

ब्लॅकबर्नमधल्या एका मदरशातल्या शिक्षणाला कंटाळून मदरशाला रामराम ठोकलेल्या एका तरुण मुलाशी बोलताना लेखकाला बरीच विचित्र माहिती कळली. खऱ्या जगातील सर्व झगमगाटापासून आणि प्रलोभनांपासून जाणीवपूर्वक दूर ठेवून फक्त इस्लामचा अभ्यास करायला लागलेल्या या तरुण मुलाला आपल्या आयुष्यातली महत्त्वाची पाच वर्षं वाया गेल्याची जाणीव झाली. कारण पाच वर्षं इस्लामचा अभ्यास केल्यानंतर त्याच्या हे लक्षात आलं की, खऱ्या जगातल्या स्पर्धेला सामोरं जाण्याच्या दृष्टीने आवश्यक असं कुठलंही शिक्षण किंवा कौशल्य त्याच्या ठायी नाही. त्याच्या पालकांना पाच वर्षं लुटण्यात आलं. संपत्ती, जमीनजुमला, ऐश्वर्य, स्त्रिया या सर्वांना नावं ठेवणाऱ्या त्याच्या शिक्षकाची स्वतःची मात्र अनेक घरं आणि अनेक बायका आहेत. नैराश्याने भरून गेलेले असे नवीन पिढीतील अनेक तरुण या शहरात आढळतात.

**ब्रॅडफर्ड**

त्यानंतर लेखक ब्रॅडफर्ड या शहरात येऊन पोचतो. ब्रॅडफर्डमधल्या मशिदींचा अधिकृत आकडा हा १०३ आहे. तेथील उपाहारगृहं, क्लब्ज, बार, डिस्को आता बंद झाली आहेत. १९९१ आणि २००१ साली शहरात झालेल्या कुप्रसिद्ध दंगलींनंतर शहरातील BMW चं मोठं शोरूम बंद झालं. इतकंच नव्हे, तर कुठलाही मोठा कारचा ब्रँड आता त्या शहरात प्रवेश करत नाही. खुद्द पोलिस स्टेशनच्या बाहेर सुस्वागतम/welcome च्या ऐवजी 'खुशामदीद' लिहिलेले उर्दू फलक लागलेले आहेत.

वर्किंग मेन्स क्लबच्या जागी आता लाला'ज वेडिंग हॉल आलाय; तर मेलबर्न पबची जागा एशियन फर्निचर शॉपने घेतली आहे. एका जुन्या पबच्या जागी शहाजलाल लतिफीया मशीद आहे, तर अन्य एका पबच्या जागी अल-खिद्र कार्पेट्सचं दुकान उघडण्यात आलंय. मेन्स क्लबच्या जागी आता नौशाही जवीया मशीद आहे तर डॉल्स अँड डान्सिंग क्लबच्या ठिकाणी धांगरी शरीफ मशीद उभं राहिलंय.

या सगळ्या मशिदींमध्ये काश्मीर, पॅलेस्टाइनमध्ये मुस्लिमांवर होत असलेले तथाकथित अत्याचार सांगून तरुणांची माथी भडकावण्याची कामं नित्यनियमाने सुरू आहेत. किताब-अत तवहीद हे खुद्द सौदी सरकारने बंदी घातलेलं इस्लाम आणि सलाफीविषयक जहाल पुस्तक इथल्या मशिदींमध्ये राजरोसपणे विक्रीसाठी उपलब्ध आहे.

गरीब कुटुंबीयांना सरकारतर्फे दिला जाणारा 'गरिबी भत्ता' हा त्या कुटुंबातील मुलांपर्यंत पोहोचत नाही. हे सरकारी पैसे काश्मीरमध्ये पाठवून काश्मीरमध्ये एक तर नवीन दुकानं उघडली जातात किंवा टॅक्सीज घेतल्या जातात. इथल्या मुलांचे खाण्यापिण्याचे, कपड्यांचे हाल मात्र होतच राहतात. अपंग मुलांसाठी देण्यात येणार सरकारी पाकिस्तानी भत्त्याचाही इथले पाकिस्तानी लोक असाच गैरवापर करतात. इथल्या अनाथ, अपंग मुलांसाठी देण्यात आलेले सगळे पैसे पाकव्याप्त काश्मीरमध्ये पाठवले जातात.

२०१६ मध्ये सलमान रश्दी यांचं पुस्तक ब्रॅडफर्डच्या रस्त्यावर जाळण्यात आलं. त्याविरुद्ध लेख लिहून आवाज उठवणाऱ्या 'ड्रमंड रोड स्कूल' या शाळेचे मुख्याध्यापक श्री हनीफर्ड यांना तडकाफडकीने नोकरीवरून काढून टाकण्यात आलं. ब्रॅडफर्डचा तत्कालीन महापौराचं नाव 'मोहम्मद अजीब' होतं हा खचितच योगायोग नसावा. त्या शाळेला भेट देण्याच्या मिषाने तिथे पोचलेल्या लेखकाला अत्यंत धक्कादायक अनुभव आले.

'ड्रमंड रोड स्कूल' चं आता IQRA असं नामांतर झालं आहे असं लेखकाला कळलं. दर्शनी खिडकीवर 'Free Palestine' असं लिहिलं असलेल्या त्या शाळेच्या शेजारी आता काश्मिरी हॉल असून, दुसऱ्या बाजूला पाकिस्तनी स्टोर आहे. शाळेच्या समोर मशीद बिलाल मदरसा असून, मागच्या बाजूला अल मरकज उल इस्लामी ही शाळा सुरू झाली आहे.

IQRA हा उर्दू शब्द असून कुराणात त्याचा उल्लेख आहे. त्याचा अर्थ 'वाच' असा असून ही मोहम्मद पैगंबरांना कुराण वाचण्याची करण्यात आलेली आज्ञा आहे हे जेव्हा लेखक आपल्याला सांगतो तेव्हा खरा धक्का बसतो. 'ड्रमंड रोड स्कुल' चं IQRA असं नामकरण का झालं असावं याचं उत्तर थेट शाळेकडूनच जाणून घेण्याचं लेखक ठरवतो. दुसऱ्या दिवशी शाळेच्या दूरध्वनी क्रमांकावर फोन करून शाळेचं नामकरण IQRA असं उर्दू भाषेत का झालं? असा थेट प्रश्न केल्यावर मिळणारं उत्तर अजूनच चक्रावून टाकणारं असतं. शाळेच्या मते IQRA हा उर्दू शब्द नसून ते Improvement, Quality, Respect and Achievement याचं लघुरूप आहे. उर्दू IQRA शब्दाशी याचा काहीच संबंध नाही का? अशी थेट पुन्हा एकवार विचारणा केल्यावर शाळेचं उत्तर असतं की, 'ही इस्लामी शाळा नसली तरी इथे शिकणारे अधिकतर विद्यार्थी हे मुस्लीम आहेत.' त्यामुळे IQRA या शब्दाचा दोनपैकी कुठलाही अर्थ आपण घेऊ शकतो. !!!

**बर्मिंगहम**

त्यानंतर लेखक आपला मोर्चा बर्मिंगहम या शहराकडे वळवतो. बर्मिंगहममध्ये Boots, Tesco, Sainsbury's, Aldi असे कुठलेही लोकप्रिय ब्रिटिश ब्रॅण्ड्स आढळत नाहीत. मात्र हलाल मटणाची दुकानं, हिजाब/बुरखे विकणारी दुकानं, इस्लामी पुस्तकं आणि

भेटवस्तू विकणारी दुकानं यांची इथे रेलचेल आहे. बिस्मिल्लाह बिल्डिंगमध्ये असलेल्या जमशेद क्लोदिंग हाऊसच्या बाहेर चेहऱ्यापासून पायापर्यंत पूर्ण कपड्यांत झाकून ठेवण्यात आलेले स्त्रियांचे mannequins आहेत. जुनेद जमशेद या वादग्रस्त पाकिस्तानी गायकाच्या नावाने असलेल्या कपड्यांच्या दुकानात 'शुद्ध इस्लामी' पद्धतीचे कपडे मिळतात. मदिना गिफ्ट शॉप नावाची दुकानं तर जागोजागी दिसतात. एकोणिसाव्या-विसाव्या शतकातल्या जुन्या घरांचं रूप आता बदललंय. सगळी घरं इस्लामी झाली आहेत. जवळपास प्रत्येक घराच्या अंगणात किंवा खिडकीत 'या रसूल अल्ला', 'माशा अल्ला', 'बिस्मिल्ला' असे फलक लागलेले आढळतात. मक्केच्या काबाचे फोटो तर जवळपास प्रत्येक घराच्या बाहेर टांगलेले किंवा रंगवलेले आढळतात. इथले अनेक तरुण सीरियामध्ये जाऊन 'आयसिस' या इस्लामी अतिरेकी संघटनेत सामील झाले आहेत.

बेलफस्ट, एडिनबर्ग, ग्लास्गो आणि इतरही अनेक महत्त्वाच्या शहरांमध्ये लेखकाला सर्रास होणाऱ्या इस्लामी लग्ना (निकाह) च्या घटना आढळल्या. ब्रिटनमधील जवळपास प्रत्येक मशिदीत इस्लाममान्य अशा शरिया पद्धतीने लग्ने लावली जातात. परंतु यातील कुठल्याही लग्नाची ब्रिटिश कायद्यान्वये नोंदणी केली जात नाही तर ती फक्त शरिया निकाह म्हणूनच राहतात. या पद्धतीमुळे स्त्रियांना धोका असतो. ब्रिटिश कायद्यान्वये लग्न न झाल्याने भविष्यात लग्न मोडायची वेळ आल्यास पुरुष पोटगी, मुलांच्या संगोपनाचा खर्च अशा कुठल्याही प्रकारच्या कायदेशीर प्रक्रियेला बांधील राहत नाही. सरळ तलाक देऊन पुढचं लग्न करण्यास तो मोकळा होतो. अशा वेळी अनेकदा स्त्रियांना स्वतःच्या मुलांचा ताबाही मिळत नाही.

कुठल्याही प्रकारच्या कायद्याचा धाक नसल्याने अशा प्रकारची लग्नं करण्याची प्रक्रियाही अतिशय सोपी आहे. मुस्लीम स्त्री-पुरुषांचे पासपोर्टस, मेहर (हुंडा) म्हणून पुरुषाने स्त्रीला काहीएक रक्कम देण्याची तयारी, जन्माला येणारी अपत्यं मुस्लीम म्हणूनच वाढवण्यात येतील अशी खात्री आणि दोन मुस्लीम पुरुष साक्षीदार (स्त्री साक्षीदार चालत नाहीत) आणले की हे निकाह लावले जातात. आणि हे अशा प्रकारचे निकाह करण्याच्या प्रकरणांत अगदी सुशिक्षित लोकांचाही अपवाद नाही. हे सर्रास सगळीकडे, सर्व आर्थिक, सामाजिक स्तरांमध्ये चालतं.

**ग्लास्गो**

लेखकाला ग्लास्गोमध्ये आलेला एक अनुभव तर ब्रिटिश मुस्लिमांच्या निष्ठा कुठल्या दिशेने आहेत यावर सुस्पष्टपणे प्रकाश टाकतो. ग्लास्गोमध्ये एका मशिदीत लेखकाला मेजर अब्दुल्ला बटल नावाचा एक ब्रिटिश मुस्लीम सैनिक भेटला. त्याने विषण्ण करणारे अनुभव सांगितले. इराक युद्धातून परत आलेल्या ब्रिटिश मुस्लीम सैनिकांवर इथल्या मुस्लीम जनतेने हल्ले केले, त्यांच्या अंगावर थुंकण्यात आलं. कारण एकच की ते मुस्लीम असूनही इराकमधल्या मुस्लीम लोकांशी लढले. मेजर अब्दुल्लाच्या तीन पिढ्या ब्रिटिश सैन्यात आहेत. आणि तरीही तो सैन्यात आहे हे तो ज्या मशिदीत नमाज पढायला येतो तिथे उघडपणे कोणालाही सांगत नाही. कारण त्यांच्या दृष्टीने मुस्लिमांशी लढणारे मुस्लीम सैनिक (ब्रिटिश असले तरी) धर्मद्रोही आहेत.

**लंडन**

लंडनमध्ये पाहिली मशीद बांधायला परवानगी देऊन, वर त्या मशिदीला भरघोस आर्थिक मदत करण्याचं 'पुण्यकर्म' हे अनेकांना प्रातःस्मरणीय असलेल्या विन्स्टन चर्चिल याच्या नावे आहे. १९४० साली बांधण्यात आलेल्या या मशिदीकडे आखाती देश आणि तिथल्या मुस्लीम लोकांशी चांगले संबंध प्रस्थापित करण्याच्या

दृष्टीने एक महत्त्वाचं पाऊल यादृष्टीने या घटनेकडे बघितलं गेलं.

लंडन हे ब्रिटनमधलं सर्वाधिक मुस्लीम लोकसंख्या असलेलं शहर आहे. दुकानं, टॅक्सी, बँका, हॉटेल्स इत्यादी सर्वत्र त्यांचं वर्चस्व आहे. लंडनमध्ये शिया जमातीचंही भरपूर प्रस्थ आहे. मोहरमच्या वेळी काढण्यात आलेल्या मोठ्या मिरवणुकीचं (जलूस) वर्णन करताना लेखकाने त्याला आलेले धक्कादायक अनुभव सांगितले आहेत. मोहरमच्या आदल्या दिवसापासून लंडनच्या प्रमुख वस्तीत असलेल्या मोठ्या मशिदीपासून ते मोठ्या रस्त्यापर्यंतचा सगळा परिसर बंद केला जातो. चौकाचौकांतून दुसऱ्या दिवशीच्या मोहरमच्या मिरवणुकीचे फलक पोलिस स्वतः लावतात. दुसऱ्या दिवशी कित्येक तास आरडाओरडा करत, गोंधळ घालत ती मिरवणूक चालू असते. त्यात शिया जमातीचा प्रेषित अलीच्या मृत्यूनिमित्त शोक व्यक्त केला जातो. पुरुष, लहान मुलं, स्त्रिया स्वतःला जखमा करून घेतात. मिरवणुकीतही स्त्रियांची जागा दुय्यमच असते. स्त्रिया मिरवणुकीच्या शेवटी चालत असतात.

मिरवणूक संपल्यावर लेखक त्या मिरवणुकीच्या मार्गावर असलेल्या अनेक घरांमध्ये जातो आणि तेथील लोकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करतो. ती मिरवणूक, आरडाओरडा, मारामारी, स्त्रियांना दिली जाणारी वागणूक या सर्वांबद्दल सर्व रहिवाशांच्या मनात अतिशय चीड आहे. परंतु त्याविरोधात काहीही करू शकत नसल्याने सगळेजण हतबलही आहेत. नगरपालिका, पोलिस यांच्याकडे या विरोधात तक्रार केली तर तक्रारींकडे दुर्लक्ष केलं जातं. कारण मुस्लिमांविरुद्ध काही कारवाई करण्याचा प्रयत्न झाला तर पोलिस आणि प्रशासनावर जातीयवादी आणि इस्लामोफोबिक असल्याचे आरोप होतात. त्यामुळे त्या भीतीने त्यांच्या विरोधात कोणीही काहीही कारवाई करत नाही. 'हे लोक आमच्या देशाचा सर्वनाश करणार आहेत!!' अशी तिथल्या नागरिकांची सार्वत्रिक भावना आहे.

२०१२ मध्ये ब्रिटनमध्ये एक प्रचंड मोठं लैंगिक शोषणाचं प्रकरण (सेक्स स्कॅण्डल) उघडकीस आलं ज्यात २० ते ५० वयोगटातल्या शेकडो पाकिस्तानी पुरुषांनी संपूर्ण इंग्लंडभर १२ ते १८ वर्ष वयोगटातल्या सुमारे एकोणीस हजार मुलींचं वर्षानुवर्षं, वारंवार, सतत लैंगिक शोषण केलं, त्यांना धमक्या दिल्या, मारहाण केली, बलात्कार केले! कैक घटनांमध्ये दुर्दैवी मुली आणि त्यांचे पालक यांनी पोलिस आणि प्रशासनाकडे असंख्य तक्रारी केल्या. परंतु एकही तक्रारीची दखल घेतली गेली नाही! कारण एकच.. इस्लामोफोबिया आणि जातीयवादी असण्याचा आरोप होण्याची भीती! या लैंगिक शोषणाच्या दुर्दैवी प्रकरणात सुमारे १९००० अल्पवयीन ब्रिटिश मुलींवर अत्याचार झाले असा अंदाज आहे.

या लैंगिक शोषणाच्या प्रकरणावर अनेक पुस्तकं लिहिली गेली, अनेक चित्रपट आणि माहितीपट प्रदर्शित करण्यात आले.


पुस्तकं

Just a Child: Sammy Woodhouse
Broken and Betrayed: Jayne Senior
Pimped : Samantha Owens
Girl for Sale: Lara McDonnell
Three Girls (मिनिसिरीज)
Betrayed Girls (माहितीपट)

**ब्रिटनची सद्यस्थिती**

लंडन, बर्मिंगहम, ब्रॅडफर्ड, ग्लास्गो, मँचेस्टर, रॉशडेल, ड्यूसबरी या आणि अशा अनेक शहरांमधली हजारो मुस्लीम कुटुंबं बँका ते हॉस्पिटल आणि किराणासामान ते टॅक्सी अशा रोजच्या व्यवहारात

लागणाऱ्या कुठल्याही प्रकारच्या सुविधा या मूळ ब्रिटिश लोकांशी महिनोंमहिने कुठल्याही प्रकारचा संबंध न ठेवताही सहजपणे उपभोगू शकतात अशी सध्याची परिस्थिती आहे. कारण मुस्लिमांची हलाल पासून ते बँकिंग, किंवा डेटिंग अप्स पर्यंत अशी स्वतंत्र आणि समांतर अशी अर्थव्यवस्था त्यांनी उभी केली आहे. इजिप्त, पाकिस्तान इत्यादी देशांमध्ये कदाचित नसेल इतकं मदरशांचं पेव ब्रिटनमध्ये फोफावतंय! शाळा, उपाहारगृह, बँका, अन्नपदार्थ, टीव्ही वाहिन्या या सगळ्या सगळ्या अधिकाधिक 'इस्लामी' बनण्याचा प्रयत्न करतायत. मदरसे, मशिदींना अधिकाधिक आर्थिक मदती केल्या जातायत, त्यांना अजून जास्त करसवलती दिल्या जातायत.




लंडनच्या शाळाशाळांमध्ये इस्लामचं अंधप्रेम आणि अन्यधर्मीय (काफर) विद्यार्थ्यांविषयी कमालीच्या द्वेषाने भरलेलं वातावरण असतं. मुस्लीम पालक आपल्या पाल्यांना शाळेतल्या नाताळाच्या कार्यक्रमात भाग घेऊ देत नाहीत. अक्षरशः पाच वर्षांच्या मुलींना सक्तीने हिजाब बांधून शाळेत पाठवलं जातं. त्यांना त्यांच्या हिंदू मित्र-मैत्रिणींशी खेळायला मज्जाव केला जातो. कारण इस्लामच्या मते हिंदू वाईट/अस्वच्छ असतात. पोहणे किंवा अन्य कुठल्याही मैदानी खेळांमध्ये मुस्लीम मुलींनी भाग घेण्यास पालकांचा सक्त विरोध असतो. नाताळच्या वेळी म्हणण्यात येणाऱ्या गाण्यांच्या कार्यक्रमात मुस्लीम विद्यार्थ्यांनी भाग घेऊ नये अशा सक्त सूचना तर त्यांचे पालक करतातच; पण चुकूनही ती गाणी कानांवर पडू नयेत म्हणून गाणी चालू असताना दोन्ही कानांमध्ये बोटं घालून बसण्याची शिकवण विद्यार्थ्यांना दिली जाते! यातल्या कुठल्याही प्रकाराला शिक्षक आक्षेप घेत नाहीत किंवा घेऊ शकत नाही. कारण तसं केल्यास त्यांना जातीयवादी किंवा इस्लामविरोधक ठरवलं जाऊ शकतं. त्यामुळे हे प्रकार शांतपणे बघत बसण्याव्यतिरिक्त त्यांना काहीही करता येत नाही.

या असल्या प्रकारच्या वातावरणात ब्रिटनची पुढची पिढी वाढते आहे. अर्थात तीही आत्ताच्या पिढीएवढीच किंबहुना अधिकच कट्टर आणि कडवी होणार हे नक्की. सन २०२० मध्ये ब्रिटिश सुरक्षा यंत्रणेने घोषित केलं की, ते किमान त्रेचाळीस हजार संशयित अतिरेक्यांवर नजर ठेवून आहेत आणि त्यातले ९०% हे मुस्लीम आहेत.

**भविष्य**

एकूण चित्र फार विदारक आहे. सुरुवातीच्या काही शतकांमध्ये तलवारींच्या जोरावर रक्तपात करत जगभर पसरलेल्या इस्लामला रक्तविहीन क्रांती करण्याचा, संपूर्ण जगाचं रूपांतर 'दार उल इस्लाम' अर्थात 'इस्लामची भूमी' म्हणून करण्याचा एक अतिशय सोपा आणि तितकाच प्रभावी असा मार्ग सापडला आहे. ते त्यांच्या मार्गाने अविरतपणे चालतायत. प्रश्न हा आहे की, जग डोळे उघडणार आहे का? या अक्राळविक्राळ जागतिक समस्येवर उपाय शोधणं ही तर पुढची बाब झाली; पण आधी ही समस्या अस्तित्वात आहे हे तरी आपण मान्य करणार आहोत का? आपल्या उत्तरावर आपला आणि आपल्या पुढच्या पिढीचा भविष्यकाळ अवलंबून आहे हे नक्की!

**– हेरंब ओक**
युवा ब्लॉगर व लेखक
heramboakgmail.com

सुरुवात कशी झाली यावर बऱ्याच घटनांचा शेवट अवलंबून असतो !

# उंटांची अदभूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून 'उंट' या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... - संपादक*

युनायटेड नेशन्सने, २०२४ हे वर्ष आंतराष्ट्रीय कॅमलीड्सचे वर्ष म्हणून घोषित केले आहे.

आपण प्रगत राष्ट्रात राहतो. सर्व प्रकारच्या सुख-सोईनीं आपले जीवन भरलेले आहे. आधुनिक तंत्रज्ञान, मोबाइल फोन, टेलिव्हिजन, विमान प्रवास, महागड्या गाड्या, उंची घरे व हॉटेल्स इ.

जवळ जवळ जगातील ९० देशांतील अतिशय प्रतिकूल परिस्थितीत राहाणाऱ्या लाखो कुटुबांचे, तेथील मुख्य समुदायाचे व स्थानिक लोकांचे कॅमेलिडस् हे उपजीविकेचे साधन आहे. हे वर्ष कॅमेलिडस् या लोकांसाठी कसे महत्त्वाचे आहे व त्यांची ठळक वैशिष्ट्ये काय आहेत यावर प्रकाशझोत टाकेल. कॅमेलिडस् परिवारांत सात प्रजातींचा समावेश होतो.

दोन कुबडांचे उंट - Bactarian Camels. बेक्ट्रीयन हे मुख्यः मंगोलियन वाळवंट व गोबीच्या



वाळवंटात, चीन मध्य आशिया, अफगाणिस्थान व आपल्या देशांत लडाखच्या थंड वाळवंटात व जेथे हवामान अतिशय थंड व अतिशय गरम, अतिशय टोकाचे असते अशा ठिकाणी आढळतात. त्याची चरबी त्यांच्या दोन कुबडींत साठवलेली असते अंगावर जाड फर (केस) असते, जी त्यांना थंडीत उबदार ठेवते व ही फर उन्हाळ्यात गळून पडते. वाळू डोळ्यांत जाऊ नये म्हणून दाट पापण्यांच्या दोन रांगा असतात. दोन बोटं असलेल्या पावलांना गादी असते म्हणून वाळूतून चालताना त्यांना जास्त जोर मिळतो. जेव्हा ते अन्न व पाणी मिळण्याच्या प्रदेशापासून दूर असतात तेव्हा कुबडींतील चरबीचा वापर करतात.

वाइल्ड बेक्ट्रीअन उंट हे गोबीच्या वाळवंटात मंगोलिया व चीन येथे आहेत. पण ते बेक्ट्रीअन उंटाचे पूर्वज नाहीत.

**Dromedary Camel**

ड्रोमेंडरी एक कुबडीचे उंट- Dromedaries आफ्रिका, सहारा वाळवंट, मध्यपूर्व, आपल्या



राजस्थानचा ते राज्यप्राणी आहेत. ड्रोमेंडरी म्हणजे 'धावणारे'. यांना अरेबियन ऊंट असेही म्हणतात. ९४% उंट या प्रकारचे असतात. त्यांची ताकद, सहनशीलता, शांत व नम्र स्वभाव यामुळे ते उपयुक्त व आकर्षक असतात. ते वाळलेले गवत व वाळवंटातील काटेरी झुडपांच्या फांद्याचा पाला खातात.

अल्पाकास- Alpacas, हे मुख्यतः एडिज पर्वताच्या उंच भागात दक्षिण पेरूत, पश्चिम बोलीव्हिया,

इक्वेडोर व उत्तर चिलीत चरताना आढळतात. आपल्या हिमालयाच्या पायथ्याशीही ते दिसतात. यांची शरीरे बारीक, लांब पाय व मान, लहान डोके व टोकदार कान असतात. ॲंडियन लोक त्यांना लोकरीसांठी पाळतात.



सध्या अल्पाका हे जगातील अनेक शेते व रांचवर हजारोंच्या संख्येने जन्मलेली व वाढवलेली किंवा पोसलेली आढळतात. ही जनावरे उत्तर अमेरिका, युरोप व ऑस्ट्रेलियात प्रसिद्ध आहेत. हे मुख्यतः त्यांच्या लोकरीसाठी वाढवले जातात. वाईल्ड उंट हे गोबीच्या वाळवंटात, मंगोलिया व चीन मध्ये आहेत.

**पेरूचा राष्ट्रीय प्राणी**



विकुनास – हे साऊथ अमेरिकेतील जे दोन जंगली किंवा वन्य कॅमेलिडस् आहेत त्यांच्यापैकी एक आहेत. दक्षिण अमेरिकेत ऐडीज पर्वतावर बोलेल्हिया, पेरू, उत्तर चिली, उत्तर पश्चिम अर्जेंटिना येथे आढळतात. यांची लोकर सर्वांत उच्च दर्जाची आहे. ती अतिशय मऊ व गरम असते. त्यांच्यापासून थोडीच, पण अतिशय उच्च दर्जाची लोकर मिळते. ती अतिशय महाग असते. कारण ती तीन वर्षांतून एकदा कापली जाते व ते वन्यप्राणी असल्यामुळे त्यांना पकडून आणावे लागते. ते लामाचे नातलग आहेत व ते पाळीव अलपाकांचेही पूर्वज आहेत. ते सर्वांत सुंदर आहेत. पण त्यांना बंदिस्त केलं तर ते चिडचिडे होतात. त्यांची लोकर कापून परत त्यांना मोकळे सोडतात. विकूना हे पेरुचा राष्ट्रीय प्राणी आहे.

ग्वानाकोस्



**Guanaco**

ग्वानाकोस हे कॅमेलिडस् दक्षिण अमेरिकेत दिसतात. त्यांचा लामांशी जवळचा संबंध आहे. हे व विकूनाज दक्षिण अमेरिकेतील वन्य (जंगली) कॅमेलिडस् पैकी आहेत. पण विकुवाज जास्त उंच प्रदेशात राहतात.



लामा हे दक्षिण अमेरिकेत ऐडिज पर्वतांवर दिसतात. हे कॅमेलिडस् इंडियात दिसत नाहीत. हे पाळीव असतात व गाऊनाकोचे वंशज आहेत. ते अन्न, लोकर, चामडी व वाळलेलं खत यांचे स्रोत, किंवा मूळ आहेत. त्यांचे कळप मुख्यतः बोलिव्हिया, चिली, अर्जेंटिना, युकेडॉर इ. देशांत असतात.

आपल्या देशांत राजस्थान मध्ये सर्वांत जास्त उंट असून त्या खालोखाल, हरियाना, मध्यप्रदेश, गुजराथ येथे आहेत. जयसरमेल (जसलमेर) हे शहर उंट सफारीसाठी प्रसिद्ध आहे.

दरवर्षी पुष्कर मेळाव्यात किंवा जत्रेत तरुण उंटांची विक्री होते. त्यांचा उपयोग वाहतुकीसाठी होतो. पण उंटपालक हे मादी उंटांची विक्री करत नाहीत. सोमालिया, आफ्रिका येथे सर्वांत जास्त उंट आहेत.

कॅमेलिडस्‌चे महत्त्व काय आहे?

ते मुख्यत: दूध व मासाचे स्रोत आहेत. त्यामुळे या लोकांना भुकेशी सामना करता येतो. कॅमलिडस् हे जगांतील अनेक लोकांचे उपजीविकेचे साधन आहे. त्याचे दूध , मांस, शेण, हाडे, केस किंवा लोकर सर्वच उपयोगात येते. त्यांच्या लोकरीच्या धाग्यापासून तयार कपडे बनवता येतात. त्यांचा उपयोग वाहतुकीसाठी होतो. ही लोकं अतिशय प्रतिकूल परिस्थितीत व वातावरणात राहतात. अँडिज पर्वतांच्या उंच भागांतून, तसेच आशिया खंडातील वाळवंटातून हे कॅमेलिडच्या सहाय्याने या भागांत राहातात.

हे उंट व त्यांच्या प्रजाती त्यांना अन्न, दूध व पौष्टिक आहार पुरवतात व त्यांची आर्थिक उन्नती साधतात. त्यामुळे जगांतील अनेक समुदायांत या प्राण्याचे आर्थिक व सांस्कृतिक महत्त्व आहे.

कॅमेलिडस्‌चे अनेक गुण आहेत. बदलते हवामान व नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करण्याची क्षमता त्यांच्यात आहे. शाश्वत प्रगतिसाठी, विकासासाठी, स्त्रियांच्या सक्षमीकरणांसाठी व बदलत्या पर्यावरणांसाठी त्याचा उपयोग करून घेणे व त्यांना मदत करणे हा या वर्षाचा मुख्य उद्देश आहे.

या भागांतील सरकार व नियोजकांना अधिक गुंतवणूक करण्यास (पैसे व वेळ) यासाठी प्रोत्साहित करणे व त्यांच्यातील क्षमता वाढविणे व त्यांच्यातले परंपरागत ज्ञान व पद्धती व वारसा या सर्वांचे जतन व पुनरुज्जीवन करणे हा हेतू आहे. त्यामुळे शाश्वत प्रगती व भूक मुक्त (zero hunger) होण्यास मदत होईल.

पहिले आंतरराष्ट्रीय कॅमलिड वर्कशॉप ५ ते १० जानेवारी रोजी साद्री येथे राजस्थानात 'लोक पशुपालक संस्थे'ने योजित केले. (LPPS) लीग ऑफ पास्टोरालिस्ट व पशुपालक संघ.

**– सौ. अल्पना बापट**
बापट हॉस्पिटल, ठाणे
भ्रमणध्वनी : ९८३३०२९३५६

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन–अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# फ्रॅन्झ काफ्का...

*३ जून १९२४ रोजी फ्रॅन्झ काफ्काचा त्या काळातील असाध्य रोगाने म्हणजे टी.बी.ने मृत्यू झाला. म्हणजे बरोबर १०० वर्षे झाली. त्या निमित्ताने त्याला आदरांजली वाहाण्यासाठी ज्येष्ठ भाषांतरकार जयंत कुलकर्णी यांनी फ्रॅन्झ काफ्काची अनुवादित केलेली एक कथा खास दिशाच्या वाचकांसाठी - संपादक*

३ जून १९२४ रोजी फ्रॅन्झ काफ्काचा त्या काळातील असाध्य रोगाने म्हणजे टी.बी.ने मृत्यू झाला. म्हणजे बरोबर १०० वर्षे झाली. त्याच्या तीन पुस्तकांचा अनुवाद मी केलाय.

१- द ट्रायल - महाभियोग

२- मेटॅमॉरफॉसिस - पिसूक यात तीन कथाही आहेत. यातील एक कथा येथे टाकणार आहे.

३- द कॅसल - ७०% पूर्ण.

त्याच्या मृत्यूनंतर सापडलेल्या अनेक चिठ्या-चपाट्यात त्याने त्याच्या जिवलग मित्राला, मॅक्स ब्रॉडला लिहिलेली पत्रे सापडली. त्यातील एकात तो लिहितो-

''माझ्या सर्व लिखाणात लिखाण म्हणावे अशी काहीच लिखाणे आहेत. द जजमेंट, द स्टोकर, मेटॅमॉरफॉसिस, पिनल कॉलनी, कन्ट्री डॉक्टर व एक कथा... हंगर आर्टिस्ट... मी जेव्हा 'ही माझी' म्हणावीत अशी पुस्तके/कथा आहेत असे म्हणतो त्याचा अर्थ असा होत नाही की, 'ती छापली जावीत अशी माझी इच्छा आहे.' खरे तर ती या भूतलावरून कायमची नष्ट झाली तर मला सगळ्यात जास्त आनंद होईल. आता ती अस्तित्वात आलीच आहेत तर कोणाला ती वाचायची असतील किंवा जवळ बाळगायची असतील तर मी त्याला अडविणार नाही...''

या यादीतील 'मेटॅमॉरफॉसिस' या एका कथेनेच त्याला जगप्रसिद्ध केले व साहित्याच्या क्षेत्रात त्याचे एक वेगळे स्थान निर्माण केले. वरील पत्रात त्याने ब्रॉडला त्याची सगळी हस्तलिखिते न वाचता जाळून टाकण्याचा विनंतीवजा आदेश दिला होता. तसाच आदेश त्याने त्याच्या एका मैत्रिणीला, डोरा डिमँटला दिला होता व तिने त्याचे कागद जाळण्यास सुरुवातही केली होती. नशिबाने ब्रॉडने तो मानला नाही म्हणून तो खजिना जगाला खुला झाला. ब्रॉड लिहितो, 'त्या काळात फ्रँझने लिहिलेला कागदाचा कपटाही मी जपून ठेवत असे. जाळण्याचा प्रश्नच नव्हता.' तसे त्याने फ्रॅन्झ काफ्काला १९२३ साली केव्हातरी एका भेटीत तसे स्पष्टच सांगितले होते.

फ्रॅन्झ काफ्कावर त्याच्या वडिलांचा चांगला/वाईट खूपच प्रभाव होता. वडील-मुलगा यांच्यातील नाते व त्यातून उद्‌भवणाऱ्या संघर्षाचे सावट त्याच्या मनावरून कधीच गेले नाही. वडिलांबद्दल वाटणारे कुठल्याही मुलाला वाटणारे प्रेम व आदिम काळापासून चालत आलेली दोन नरांमधील ईर्षा याच्या कात्रीत सापडलेली त्यांची मने हा एक त्याच्या दृष्टीने अभ्यासाचा विषय असावा. किंबहुना त्या नात्यामधे त्याला विशेष रस असावा असे वाटते. सप्टेंबर २२ आणि सप्टेंबर २३, १९१२ या दोन दिवसांत त्याने एका तंद्रीमधे 'द जजमेंट' ही गोष्ट लिहून काढली. त्याबद्दल तो लिहितो, 'सलग आठ तास बसून मी मनाच्या एका धुंद अवस्थेत ही कथा लिहून काढली. खरे लिखाण अशा प्रकारेच होते याची आता मला खात्री पटली आहे. जेव्हा तुमचे मन व शरीर तुमच्यापुढे उघडे होते तेव्हाच तुमच्या हातून खरे लिखाण होऊ शकते....' या कथेत

'वडिलांनी रचलेले कुभांड' या वाक्याने त्याच्या कोंडलेल्या भावनेचा स्फोट झालेला आपल्याला जाणवतो...या कथेनंतर काफ्काचा कथाकार म्हणून आत्मविश्वास खूपच वाढलेला दिसतो. कारण लगेचच त्याने नंतर मेटॅमॉफॉसिस लिहिली......

मी कॉलेजमधे असताना आम्ही काफ्कावर चर्चा करायचो. नंतर नंतर हे वेड कमी होत गेले... कदाचित फ्रँझ काफ्काच्या लिखाणाचा प्रभाव कोणाच्या लिखाणावर आहे हे कळल्यावर सध्याचे वाचक निदान ही कथा वाचतील तरी...

आल्बर्ट कामू, गॅब्रिएल गार्शिया, जाँ पॉल सार्त्र ही काही नावे ज्यांच्यावर काफ्काच्या लिखाणाचा प्रभाव आढळतो.

काही तज्ज्ञांच्या मते काफ्का SPD चा (शिझॉईड पर्सनॅलिटी डिसऑर्डर) एक रुग्ण होता. यात माणसाला वैराग्य, एकलकोंडेपणा, भावनिक थंडपणा, इ. ही त्याची लक्षणे आहेत. मला वाटते, माणसाच्या आयुष्यात केव्हा ना केव्हातरी माणूस याचा शिकार होत असावा... त्यावेळी काफ्काची काही वाक्ये न आठवली तर नवलच...उदा. तुमच्या आसपासची जवळची माणसे जेव्हा अशी का वागतात हे जेव्हा तुम्हाला प्रयत्न करूनही उमजत नाही...तेव्हा...

''माझ्या मेंदूत हे जग (सर्व अनुभवासकट) कोंबलेले आहे. त्यापासून मेंदूच्या ठिकऱ्या न होता कशी सुटका करून घ्यायची हा खरा प्रश्न आहे....''

जेव्हा तुमच्यावर जबरदस्ती केली जाते तेव्हा..

''माझ्या या चार भिंतीमधे मला एखाद्या तुरुंगात कोंडलेल्या विस्थापितासारखे वाटत आहे..... माझे कुटुंबीय मला परके वाटतात आणि त्यांची भाषा मला समजत नाही, उमगत नाही.... आणि माझ्या मनाविरुद्ध ते मला त्यांच्या अनाकलनीय कर्मकांडामधे जबरदस्तीने सामील करून घेतात......''

आता त्याची कथा लिहितो.. ही कथा नीट वाचा. म्हणजे काफ्काच्या लिखाणाचे सामर्थ्य आपल्याला समजेल. वाचल्यावर आपले विचार येथे जरूर मांडा..

अकादमीला सादर केलेला अहवाल !

अकादमीच्या विद्वान सद्गृहस्थांनो :

माझ्या पूर्वायुष्याचा अहवाल सादर करण्यासाठी तुम्ही मला आज येथे आमंत्रित केले, हा मी माझा बहुमान समजतो. अर्थात मी माझे पूर्वायुष्य एक मर्कट म्हणून व्यतीत केले, हे आपणा सगळ्यांना माहीत असेल हे मी गृहीत धरले आहे. ज्यांना माहीत नाही त्यांना कळावे म्हणून मी हा उल्लेख केला.

या आमंत्रणाचा शब्दश: अर्थ घेतला तर दुर्दैवाने मी खऱ्या अर्थाने आपल्या अपेक्षा पूर्ण करू शकत नाही. माझ्या पूर्वायुष्यातून मी या जीवनात प्रवेश केला त्याला आता पाच वर्षे उलटून गेली. दिनदर्शिकेत डोकाविल्यास हा काळ लहान वाटेल; पण या काळातून उड्या मारताना मला तो कधीच संपणार नाही असा वाटत होता, अनंत वाटत होता. या प्रवासात मला चांगले लोक भेटले, सल्लागार भेटले, टाळ्या वाजवून कौतुक करणारे, संगीतकार भेटले; नाही असे नाही. पण तसा मी एकटाच होतो. रेल्वेच्या डब्यातील इतर कधीच रुळाच्या जवळ नसतात. हे आपले त्या (प्रवासाच्या) रूपकात राहून सांगणे क्रमप्राप्त आहे म्हणून सांगितले. मी जर स्वेच्छेने माझ्या भूतकाळाला किंवा माझ्या तरुणपणीच्या आठवणींना कवटाळून बसलो असतो तर हे परिवर्तन झालेच नसते याची मला जाणीव आहे. खरे तर कुठलीही इच्छा मनात धरायची नाही हा सर्वोच्च नियम मी स्वत:पुरता घालून घेतला होता. मी, एका स्वतंत्र कपिने स्वत:हून ते जोखड खांद्यावर घेतले. त्यामुळे माझ्या आठवणी हळूहळू दगा देऊ लागल्या आहेत. जर मानवाने मला आधीच त्या आठवणी

विचारल्या असत्या तर बरे झाले असते. तेव्हा पृथ्वीला झाकणाऱ्या विशाल आकाशाच्या घुमटासारख्या त्या माझ्या भोवती दाटलेल्या असायच्या. आता मात्र माझ्यातील सुधारणांमुळे तो आठवणींचा घुमट बुटका आणि अरुंद झाला आहे. इतका की, मी त्यात धड उभाही राहू शकत नाही !

माणसाच्या जगात मला सुरक्षित वाटले. माझ्या पूर्वायुष्यात उठणारी वादळे आता हळूहळू शांत झाली होती. आता वाऱ्याची गार झुळूक माझ्या पावलांना स्पर्श करते. दूरवर असणाऱ्या ज्या भोकातून ती झुळूक येते त्याचा आकार आता इतका कमी झाला आहे की, मी त्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला तर माझी कातडी सोलवटून निघेल. तरीसुद्धा मला त्यातून जाता येईल की नाही याची शंकाच आहे. अगदी खरे सांगायचे तर माझ्या दोन अवस्थांमधील फरक आणि तुमच्या दोन अवस्थांमधील फरक यात विशेष काही फरक आहे असे मला वाटत नाही. अर्थात तुम्ही मर्कट अवस्थेतून येथपर्यंत आला आहात हे तुम्हाला मान्य असेल तर ! पण पृथ्वीवरील प्रत्येक भटक्याच्या टाचेत एक भिंगरी फिरत असते. अगदी चिंपांझी पासून ते अखिलिसपर्यंत. मी कदाचित तुमच्या अपेक्षा पूर्ण करू शकेन, त्यात मला आनंदच वाटेल.

मी प्रथम काय शिकलो असेन तर हस्तांदोलन करायला; हस्तांदोलनामुळे दोन व्यक्तींमधे मोकळेपणा येतो असे म्हणतात. मग त्या माझ्या पहिल्या हस्तांदोलनाला मी माझ्या मनमोकळ्या मतांची जोड का देऊ नये ? माझा हा अहवाल अकादमीला काही शिकवेल असा माझा बिलकुल दावा नाही. किंबहुना त्यात नवीन काही आहे असे मला वाटत नाही. कदाचित तो आपल्या अपेक्षा पूर्ण करण्यास असमर्थ ठरेल. पण कदाचित हा अहवाल एका कपिने मनुष्य योनीत कसा प्रवेश केला व तेथे तो कसा प्रस्थापित झाला याचा पथदर्शक ठरेल आणि शिवाय मला स्वत:ला खात्री असल्याशिवाय व ती पात्रता मिळाल्याशिवाय मी या सुसंस्कृत जगाच्या प्रहसनात्मक वाटचालीबद्दल बोललोही नसतो.

मी आलो अफ्रिकेतील एका किनाऱ्यावरून. मी कसा पकडलो गेलो याबद्दल मी नाही सांगू शकणार. पण मी त्याबद्दल जे वाचले आहे ते सांगू शकतो. हॅगेनबर्ग कंपनीचा म्होरक्या झुडपांच्या मागे दबा धरून बसलेला असताना माकडांच्या एका कळपाने त्याच्यासमोरून पाणवठ्याकडे जाणारी वाट पकडली. त्यांनी बंदुका चालविल्या. सगळे वानर निसटले, पण मला गोळ्या लागल्या. मी दोन ठिकाणी जखमी झालो..

एक गोळी माझ्या गालाला घासून गेली, पण त्याचा मोठा लाल रंगाचा व्रण मात्र राहून गेला; ज्याने माझे नाव पडले 'रेड पीटर'. त्यावेळेस येथे अजून एक वानर होता 'पीटर' नावाचा. ही कुठल्यातरी वानराचीच कल्पना असावी. जणू काही त्या पीटरमधे आणि माझ्यामधे फक्त या व्रणाचाच फरक होता. हा पीटर थोडाफार प्रसिद्ध होता. नुकतेच त्याने एका बादलीला लाथ मारून त्यातील दूध लवंडले असे सांगतात. असो...

दुसरी गोळी मला लागली ती ढुंगणाखाली. ही जखम मात्र मोठी होती आणि माझ्या लंगडत चालण्यामागचे कारण तेच आहे. मी अजूनही लंगडतोच आहे. कालपरवाच मी वर्तमानपत्रात माझ्याबद्दल एक बातमी वाचली. वर्तमानपत्रात लिहिणाऱ्या वाचाळ पत्रकारांपैकीच कोणी एकाने लिहिली असणार ती बातमी. त्याचे म्हणणे होते की, मी अजूनही थोडासा माकडच आहे. त्याचा पुरावा काय? तर म्हणे, मी ही जखम दाखविताना अजूनही माझी चड्डी खाली ओढतो. त्याची सगळी बोटे छाटली पाहिजेत. त्या मूर्खाला कळायला पाहिजे; मला कोणासमोरही माझी चड्डी खाली करण्याचा पूर्ण अधिकार आहे! त्यांना फक्त माझे

यश मिळवायचं असेल तर स्वत:च स्वत:वर काही बंधनं घाला.

केसच दिसतील व तो व्रण. सगळे उघड आहे. त्यात काहीही लपविण्यासारखे नाही. सत्याचा प्रश्न येतो तेव्हा हे सगळे शिष्टाचार विसरायलाच पाहिजेत. या उलट, जर त्या लेखकाने जर लोकांसमोर त्याची विजार खाली ओढली तर भलताच प्रसंग उभा राहील! तो तसे करीत नाही त्याबद्दल मी त्याचे आभार मानतो. पण त्याचा अर्थ असा होत नाही की, त्याने या फालतू कारणासाठी माझी बदनामी करावी.

त्या बंदुकीच्या आवाजाने मी जागा झालो आणि येथेच माझ्या आठवणी सुरू झाल्या असे म्हणण्यास हरकत नाही. मी डोळे उघडले तेव्हा हॅगेनबेकच्या जहाजावर एका पिंजऱ्यात होतो. तीन बाजूला जाळी व एका बाजूला फळ्या असा हा खास पिंजरा होता. त्यात फक्त एक मोठी अडचण होती म्हणजे, तो पुरेसा उंच नव्हता. त्यात मला धड उभेही राहता येत नव्हते. अरुंद तर इतका होता की, मला खालीही नीट बसता येत नव्हते. शेवटी मी कसाबसा गुडघे वाकवून उभा राहिलो. माझे गुडघे अखंड थरथरत होते. कोणी मला पाहू नये म्हणून मी फळ्यांकडे तोंड केले, पण त्यामुळे ती जाळी माझ्या कातडीत खुपत होती. प्राण्यांना या पद्धतीने पिंजऱ्यात डांबणे ही त्यांच्या वाहतुकीसाठी आदर्श पद्धत आहे हे आता मी माझ्या अनुभवाने सांगू शकतो. तुमच्या बाजूने विचार केल्यास तेच बरोबर आहे.

पण मला त्यावेळी माझ्या मनात असले काही विचार नव्हते. माझ्या आयुष्यात मला बाहेर पडता येत नव्हते. सरळ तर नाहीच नाही. माझ्यासमोर फळ्या होत्या. एकामेकांना घट्ट जोडलेल्या. दोन फळ्यांच्या मधे थोडीशी फट होती. ती पाहिल्यावर माझ्या तोंडातून आनंदाने चित्कार बाहेर पडला; पण त्यातून माझी शेपटीही जाऊ शकत नव्हती. माझी सर्व शक्ती वापरूनही मी ती फट थोडीसुद्धा मोठी करू शकलो नाही.

नंतर त्यांनी मला सांगितले की, मी तसा शांत होतो. इतरांसारखा गडबड करीत नव्हतो. त्यावरून त्यांनी म्हणे असे अनुमान काढले होते की, मी जर त्या जिवघेण्या प्रवासातून जगलोवाचलो तर एक चांगला माणसाळलेला, शिकवलेला वानर बनू शकेन. मी मात्र त्या जिवघेण्या काळातून प्रवास केला. हुंदके दाबत, कष्टपूर्वक उवा काढत, कष्टाने नारळ चाटत, त्या पिंजऱ्यावर माझे डोके आपटत मी प्रवास केला. कोणी जवळ आले तर मी माझी जीभ बाहेर काढत असे. माझ्या नवीन जीवनाची सुरुवात ही अशी झाली. पण माझ्या मनात एकच भावना दाटून येत होती आणि ती म्हणजे आता यातून सुटका नाही! आज मी माझ्या आठवणींतून हे सगळे चित्र रेखाटतो आहे. त्यामुळे त्यात काही चुका असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मी अगदी प्राचीन कपिसत्याच्या जवळ पोहोचलो नसेन कदाचित; पण माझे वर्णन फार काही चुकीचे असेल असे मला वाटत नाही. याची मला खात्री आहे.

आत्तापर्यंत माझ्याकडे प्रत्येक गोष्टीला उत्तर होते, मार्ग होते, ते एकदम बंद झाले. मी दबलो. मला खिळ्यांनी खिळविले असते तरी माझ्या स्वातंत्र्याचे हक्क काही कमी झाले नसते. का बरे ? तुमच्या पंज्यामधील कातडी रक्तबंबाळ होईपर्यंत खाजविली तरी तुम्हाला याचे उत्तर मिळणार नाही! माझ्या सुटकेचा मार्ग माझ्याकडे नव्हता, पण मला तो तयार करायचा होता, नाहीतर माझा मृत्यू अटळ होता. त्या फळ्यांकडे पहातच माझा मृत्यु झाला असता. हॅगेनबेकने सर्व प्रकारच्या माकडांची हीच जागा ठरविली असेल तर मला वानर म्हणून जगणे थांबविले पाहिजे. मी मनात म्हणालो. वानरे, माकडे त्यांच्या पोटातून विचार करतात. त्यामुळे माझ्या पोटात त्याबाबतीतील विचार हळूहळू आकार घेऊ लागले.

मी ''उत्तर आणि मार्ग'' हे शब्द वापरले आणि स्वातंत्र्य हा शब्द वापरला नाही हे तुमच्या लक्षात आले असेलच. कारण स्पष्ट आहे. माणसांना स्वातंत्र्य

म्हणजे जे अभिप्रेत असते ते मला नकोच होते. ज्यासाठी तुम्ही रक्तरंजीत लढे उभारले ते स्वातंत्र्य मला तेव्हाही नको होते आणि आत्ताही नको आहे. जाता जाता एक गोष्ट तुमची हरकत नसेल तर नमूद कराविशी वाटते. - ''स्वातंत्र्य हा शब्द मनुष्यप्राण्याला नेहमीच फसवतो. त्याचा विश्वासघातच करतो म्हणा ना ! स्वातंत्र्य ही भावना सर्वश्रेष्ठ मानली जाते. तसे असेल तर त्या शब्दाने केलेला भ्रमनिरासही सर्वश्रेष्ठ समजला पाहिजे! करमणुकीच्या खेळामधे माझ्या पाळीची वाट पाहताना मी छतावर टांगून घेतलेल्या कसरतपटूंच्या कसरती पहात असे. ते त्या हिंदोळ्यांवर झोके घेतात, पुढे-मागे होतात, मधेच हवेत उसळी घेतात, एकमेकांच्या बाहूत शिरतात. कधी कोणी कोणाच्या केसाला लटकतो, तर कोणी कोणाच्या दातात धरलेल्या दोरीला.... आणि त्यालाही माणसांचे 'स्व-नियंत्रीत स्वातंत्र्य' म्हटले पाहिजे. निसर्गाची कसली चेष्टा चालविली आहे. त्या कसरती जर प्रेक्षकांऐवजी कपिंनी भरलेल्या तंबूत त्यांनी केल्या तर त्या तंबूच्या कनाती उठलेल्या हास्यकल्लोळांनी टराटरा फाटतील.

नाही ! स्वातंत्र्य नकोच होते मला. मला फक्त मार्ग पाहिजे होता. उजवीकडे, डावीकडे, सरळ कोठेही.. मी दुसरी कुठलीच मागणी केली नव्हती. जरी असा मार्ग सापडणे हा भ्रम होता हे मान्य केले तरी, ती मागणी इतकी छोटी होती की, त्यातून होणारा भ्रमनिरास निराश करण्याइतका नक्कीच मोठा नव्हता. बाहेर पडणे...बस्स बाहेर पडणे... असे थरथरत उभे नव्हते राहायचे मला...

आज मला ते सगळे अगदी स्पष्ट दिसतंय, जाणवतेय.. मी जर अंतर्बाह्य शांत राहिलो नसतो तर मला ते बाहेर पडणे जमले असते की नाही याची शंकाच आहे! त्याचे सगळे श्रेय मी त्या जहाजाच्या कर्मचाऱ्यांना देतो.

चांगली माणसे होती ती. त्यांच्या पावलांचा आवाज अजूनही मला चांगलाच आठवतोय. त्या दमदार पावलांचा आवाज माझ्या गुंगीत असलेल्या डोक्यात गुंजत असे. मला अजून आठवतंय, त्यांना प्रत्येक गोष्ट हळूहळू करण्याची सवय होती. त्यातील कोणाला डोळे चोळायचे असले तर तो तो त्याचे हात मणामणाचे असल्यासारखे उचलायचा. ते हसायचे खर्जात आणि भयानक; पण त्यात काही अर्थ भरलेला नसायचा. त्यांच्या तोंडात ते सतत काहीतरी चघळत असत आणि ते सतत कोठेही थुंकत असत. माझ्या केसांतून त्यांच्या कपड्यावर पिसवा येतात अशी ते तक्रार करायचे; पण त्याबद्दल त्यांना चीड येत नसे. माझ्या केसाळ कातडीत पिसवा असणारच आणि त्या उड्या मारणारच हे त्यांनी गृहीत धरले होते! मधल्या सुट्टीत किंवा कामे झाल्यावर ते माझ्या भोवती अर्धवर्तुळात बसायचे. ते क्वचितच बोलायचे, पण मधून मधून त्यांचे हुंकार मला ऐकू यायचे. ते पाईप ओढत व मी थोडी जरी हालचाल केली तरी लगेच मांड्यांवर थाप मारायचे. त्यातील एकजण मला काठीने कुरवाळायचा. मला आवडायचे ते. आज जर मला कोणी जहाजावर सफरीचे आमंत्रण दिले तर मी ते अर्थातच नाकारेन, पण त्या जहाजावरील सगळ्याच आठवणी तिरस्करणीय होत्या असा त्याचा अर्थ होत नाही!

माझ्या मनातील खळबळ थांबली ती या लोकांमुळेच. ती थांबल्यामुळेच मी पळून जाण्याच्या प्रयत्नांपासून दूर राहिलो. आज मागे वळून पाहताना मला वाटते, त्या वेळेस पळून जावे किंवा मरण पत्करावे असा विचार माझ्या मनात आला असणार. पण यातून सुटकेचा खरा मार्ग 'तेथून पळून जाणे' हा नव्हता. सुटका शक्य होती का नव्हती हे मी आत्ता सांगू शकत नाही. पण बहुदा शक्यता असावी. कारण वानरांना किंवा आमच्या जातकुळीला ते सहज शक्य असते; मी

कदाचित त्या जाळीचे चावून तुकडे करू शकलो असतो; पण तसे करून काय फायदा झाला असता? मला पाहिल्या पाहिल्या त्यांनी मला पकडून परत त्या पिंजऱ्यात डांबले असते आणि कदाचित माझ्या पिंजऱ्याची जागा बदलली असती. किंवा मी कदाचित तेथून इतर प्राण्यांच्या गर्दीतून पसार झालो असतो. कदाचित माझ्या समोर असलेल्या अजगराच्या अजगरमिठीत पहुडलो असतो व शेवटचा श्वास घेतला असता. किंवा मी डेकवर पोहोचलो असतो तर काय केले असते ? पाण्यात उडी मारली असती? पण पाण्यावर काही क्षण हेलकावे खात मी समुद्रात बुडालो असतो. सुटकेचे अगतीक मार्ग ! मी त्यावेळेस ठरवून मनुष्यप्राण्यासारखा विचार केला नाही हे सत्य आहे; पण त्या परिस्थितीत माझ्या हातून तसे आपसूक घडले खरे!

मी सुटकेवर फार विचार केला नाही. पण मी लक्षपूर्वक निरिक्षण करीत होतो. मी येणारी-जाणारी माणसे पहात होतो. त्यांचे चेहरे सारखे होते. एवढेच नव्हे तर, त्यांच्या हालचालीही सारख्या होत्या. मला वाटायचे की तो एकच माणूस आहे की काय !. ही माणसे किंवा हा माणूस मुक्तपणे तेथे वावरत असे. मला मी त्यांच्यासारखा झालो तर त्या पिंजऱ्यातून काढण्यात येईल असे आश्वासन कोणी दिले नाही. अकस्मात घडणाऱ्या अशक्य घटनांत अशी आश्वासने कोणी देत नसतो याची मला कल्पना आहे. पण जर अशक्य ते शक्य करून दाखविले तर ज्या ठिकाणी तुम्ही ती आश्वासने शोधलीत त्याच ठिकाणी ती तुम्हाला कधीतरी सापडू शकतात. थोड्याच काळात त्या माणसांना माझे कुतूहल वाटेनासे झाले. मला जर खरोखरच वर उल्लेखलेल्या स्वातंत्र्याचा ध्यास लागला असता तर मी सुटकेऐवजी समुद्रात जीव दिला असता. त्या निरिक्षणांच्या दबावाखालीच मला वाटते, मी योग्य मार्ग निवडला असावा.

या लोकांची नक्कल करणे तसे फारच सोपे होते. पहिल्या काही दिवसांत मी त्यांच्यासारखे थुंकण्यास शिकलो. मग आम्ही एकमेकांच्या चेहऱ्यावर थुंकायला लागलो. पण आमच्यात एक फरक होता. मी थुंकल्यानंतर माझे तोंड चाटून पुसून स्वच्छ करायचो; तर ते काहीच करायचे नाहीत. थोड्याच दिवसात मी त्यांच्यासारखा पाईप ओढायला लागलो. जेव्हा मी पाईपच्या तोंडावर माझा अंगठा दाबत असे तेव्हा ते आश्चर्याने चित्कार करीत. पण तो पाईप भरलेला आहे की रिकामा हे समजण्यास मला पुढे पुष्कळ दिवस लागले!

मला सगळ्यांत जास्त त्रास झाला तो रमची बाटली उघडताना. त्याच्या वासाचा मला तिरस्कार वाटायचा. पण जेवढा मला तिरस्कार वाटे तेवढ्याच जोमाने मी तिचे बूच उघडण्याचा प्रयत्न करी. विचित्र म्हणजे माझा हा संघर्ष ते सगळ्यांत जास्त गंभीरपणे घेत. ते का ते मला कधी कळले नाही. काही आठवड्यानंतर मला त्या बाटली विषयी वाटणारी घृणा थोडी कमी झाली. मला माणसे ओळखू येत नव्हती. पण एक माणूस रोज सकाळी, दुपारी, संध्याकाळी, रात्री माझ्याकडे येई. तो माझ्यासमोर बाटली घेऊन उभा राही व मला ती उघडण्यास शिकवत असे. त्याला मी समजत नव्हतो. बहुतेक त्याला माझ्या अस्तित्वाचे कारण समजून घ्यायचे असेल. तो हळूच त्या बाटलीचे बूच उघडे व मी त्याच्याप्रमाणे करतो आहे का नाही हे पहात असे. मी त्याच्याकडे अगदी एकाग्रतेने पहात असे. असा विद्यार्थी या जगात कुठल्याही शिक्षकाला शोधूनही सापडणार नाही! बूच उघडल्यावर तो ती बाटली तोंडापाशी नेई. मी पहातोय हे पाहून तो ती ओठांना लावे. मी मोठ्या कष्टाने त्याची नक्कल करायला जाई. ते पाहून तो खुष होई व माझ्याकडे पाहून मान डोलावत असे. बऱ्याच कष्टांनंतर त्या प्रकाराने मी दमून हतबल होऊन त्या जाळीला लटकत त्याच्याकडे पाही. त्याच वेळी तो मागे झुकून ती बाटली तोंडात रिकामी

---

जर तुम्ही नेहमीच सर्वसाधारण जीवन जगण्याचा प्रयत्न करीत असाल,
तर तुम्हाला हे कधीच उमजणार नाही की तुम्ही किती असामान्य आहात!

करायचा. पोटावरून हात फिरवून तो माझ्याकडे बघत हसायचा.

या शिकवणी नंतर मग प्रत्यक्ष प्रयोगास सुरुवात होई. 'एवढे दमल्यानंतर?' हो! माझ्या नशीबातच होते ते. माझ्या पुढे केलेली बाटली मी सर्वशक्तिनिशी उचलून त्याचे बूच काढून थरथरत ती तोंडाला लावली व खाली फेकून दिली. हो, तिरस्काराने खाली फेकून दिली. खरे तर त्या बाटलीत काहीच नसायचे. त्या रिकाम्या बाटलीत असायचा फक्त दारूचा वास. ते पाहून माझ्या शिक्षकास अतीव दु:ख होत असणार. मलाही होत असे. पण हे सगळे झाल्यावर मी पोटावरून हात फिरविण्यास व जबडा फाकवून हसण्यास मात्र विसरत नसे!

आमची शिकवणी बहुतेक वेळा अशीच संपत असे. पण माझ्या शिक्षकाला माझा राग येत नसे त्याबद्दल त्याचे कौतुकच केले पाहिजे. अर्थात कधी कधी तो मला त्याच्या पाईपने चटके देई; पण मोठ्या प्रेमाने त्याच्या प्रेमळ, भल्या मोठ्या हाताने माझ्या केसांना लागलेली आग विझवत असे. माझ्यावर तो कधीच रागावला नाही; बहुतेक त्याला आम्ही दोघेही माकडांच्या मूळ स्वभावाविरुद्ध काम करीत आहोत व माझे काम जास्त अवघड आहे याची त्याला जाण असावी.

पण आम्ही एक दिवस विजयश्री खेचून आणलीच. एका संध्याकाळी बहुदा कसलातरी समारंभ असावा. ग्रामोफोनवर छान गाणे लागले होते. माझ्यासमोर कर्मचाऱ्यांमधे अधिकारी फिरत असताना, मला ती बाटली दिसली. माझ्या पिंजऱ्याबाहेर कोणीतरी अनावधानाने विसरून गेले असणार. मी सराईतासारखी ती उचलली. तिचे बूच काढले व सर्वांसमक्ष एखाद्या सराईत दारूड्यासारखी घशात रिचवली व फेकून दिली. पण यावेळेस तिरस्काराने नाही; तर एखाद्या कलाकारासारखी रुबाबात ! गंमत म्हणजे यावेळेस मी माझ्या पोटावरून हात फिरविण्यास व जबडा फाकविण्यास विसरलो! कारण काय चालले आहे मला कळेनासे झाले होते. माझ्या तोंडून आपोआप शब्द बाहेर पडले, ''हॅलो'' आणि मी माणसात आलो! माझ्या 'हॅलो'चे असंख्य प्रतिसाद मला ऐकू आले. कोणी तरी कुरवाळावे तसे त्यांचे शब्द माझे घामाने डबडबलेले शरीर कुरवाळत होते,-

''बघा तो बोलतोय! बघा तो बोलतोय!''

मी परत एकदा सांगतो, मला मनुष्याची नक्कल करण्याचा अजिबात मोह नव्हता. मी ते केले. कारण मला माझी सुटका करून घ्यायची होती. बस्स.... एवढेच! त्या प्रकरणाचा मला विशेष फायदा झाला नाही. थोड्याच वेळात माझा मानवी आवाज गेला व मला दारूची जास्तच घृणा वाटू लागली. पण आता कुठला मार्ग पकडायचा हे मात्र मला स्पष्ट झाले.

एका प्राणीसंग्रहालयातील प्रशिक्षकाकडे मला सुपुर्द करण्यात आले. काहीच दिवसांत मला कळले की, माझ्यापुढे आता दोन पर्याय उपलब्ध आहेत. एक म्हणजे त्या प्राणीसंग्रहालयात एक प्राणी म्हणून रहायचे किंवा सर्कसमधे किंवा करमणुकीच्या कंपनीत सामील व्हायचे. मी मनाशी म्हटले, ''प्राणी संग्रहालयात राहू नकोस. तेथे फक्त तुझा पिंजरा बदलेल. एकदा का तू तेथे गेलास की संपले सगळे!''

मग माझे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी मी, सभ्य गृहस्थ हो, शिकण्यास प्रारंभ केला. एखाद्याला सुटका करून घ्यायची असेल तर शिकायलाच लागते. मग तो स्वत:च चाबूक घेऊन स्वत:ला शहाणा करू लागतो. थोडासा जरी विरोध झाला तर स्वत:ची कातडी सोलवटून काढण्यास तो मागेपुढे पहात नाही. काहीच दिवसांत माझ्यातील वानर मेला. पार मेंदूपासून ते पायाच्या नखापर्यंत वानराने माझ्यातून पळ काढला. याचा परिणाम एक झाला की, माझा हा शिक्षक जवळ जवळ वानर झाला! त्याने लवकरच शिकविणे बंद केले व त्याला

वेड्यांच्या इस्पितळात भरती केले गेले. नशिबाने त्याची परत सुटका झाली.

नंतर मी अनेक शिक्षकांचा वापर केला. कधी कधी तर एकाच वेळी अनेक शिक्षक मला शिकवत असत. जसा माझा आत्मविश्वास वाढला, लोक माझ्या प्रगतीत रस घेऊ लागले, तसे माझे भवितव्य उज्ज्वल दिसू लागले. नंतर नंतर तर मी स्वत: शिक्षकांना नोकरीवर ठेवू लागलो. त्यांना मी पाच वेगवेगळ्या खोल्यांतून ठेवले व त्यांच्याकडून एकदमच शिकू लागलो. अर्थात ते मला सहज साध्य झाले. कारण मी एका खोलीतून दुसऱ्या खोलीत सहज उड्या मारीत असे.

काय प्रचंड प्रगती केली मी ! माझे मलाच खरे वाटेना. जागृत अवस्थेत येणाऱ्या माझ्या मेंदूत ज्ञानाचे किरण चहुबाजूने घुसू लागले. मी माझ्यावरच भयंकर खूश झालो हे मी नाकारत नाही. पण मी त्याला फार महत्त्व दिले नाही आणि आत्ताही देत नाही याची कबुली मला दिली पाहिजे. मोठ्या कष्टाने, जे आजवर कोणीच केले नसेल. मी अतिसामान्य माणसाच्या पातळीवर पोहोचलो. त्याबद्दल बोलण्यासारखे कदाचित विशेष काही नसेल, पण मी माझ्या पिंजऱ्यातून बाहेर पडलो व खऱ्या अर्थाने माझी सुटका झाली. मला माझा मार्ग सापडला. एक चांगला वाक्यप्रयोग आहे : 'गोंधळातून धडपडत मार्ग काढणे.' मी तेच केले. मला दुसरे काहीच करता येण्यासारखे नव्हते. कारण स्वातंत्र्य हे माझे कधीच ध्येय नव्हते.

मी जेव्हा मागे वळून बघतो आणि मी काय काय साध्य केले आहे याचा आढावा घेतो तेव्हा मला तक्रारीला जागा राहात नाही. पण मी तेवढ्यावर संतुष्ट नाही हेही खरे आहे. मी आता विजारीच्या खिशात हात खुपसून, टेबलावरील मद्याच्या बाटलीकडे आरामात पहात बसतो. जेव्हा माझ्याकडे एखादा पाहुणा येतो तेव्हा मी त्याचे चालीरितीप्रमाणे आगतस्वागत करतो. माझा व्यवस्थापक त्यावेळेस माझ्या बैठकीच्या खोलीत असतो. मी घंटा वाजविल्यावर तो धावतपळत येतो व मी काय सांगतोय ते नीट ऐकतो. सध्या तर मी रोज संध्याकाळी करमणुकीचे प्रयोग लावतो. आता अजून काही यश मिळवायचे राहिले आहे असे मला वाटत नाही. मी जेव्हा मेजवान्या झोडून किंवा शास्त्रीय परिषदांना हजेरी लावून रात्रीबेरात्री घरी येतो तेव्हा मी माझी वाट पाहणाऱ्या एका मादीचा तुमच्याप्रमाणेच उपभोग घेतो. दिवसा मला तिच्याकडे ढुंकुनही पाहवत नाही. कारण मला तिच्या डोळ्यात वानराचा भाव अजूनही दिसतो. बाकीच्यांना तो समजत नाही; पण मला तो बरोबर कळतो. तिचे शिक्षण अजून पूर्ण झाले नाही ना ! आणि होईल असेही मला वाटत नाही. तिचा तो अवतार मला अगदी सहन होत नाही.

एकंदरीत मला जे मिळवायचे आहे ते मी मिळवले आहे, पण कृपया मला आता हे सांगू नका की, मी जे काही मिळवले आहे ते सगळे अस्थायी आहे.... मी काही माणसांनी माझा न्याय करावा म्हणून येथे आलेलो नाही. मी फक्त माझे ज्ञान तुमच्याबरोबर वाटतो आहे. मी फक्त एक अहवाल सादर करीत आहे. या अकादमीच्या विद्वान सद्गृहस्थहो; मी फक्त अहवाल सादर केलाय....

मूळ लेखक : फ्रँझ काफ्का
भाषांतर : जयंत कुलकर्णी.

या भाषांतराचे सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन आहेत. याचे वाचन, नाट्याविष्कार करायचे असल्यास लेखकाची परवानगी आवश्यक आहे. असा प्रयोग इतर भाषांत होत असतो म्हणून हे लिहिले आहे.

**– जयंत कुलकर्णी**
ज्येष्ठ अनुवादक
पुणे

---

यश हे सोपे; कारण ते कशाच्यातरी तुलनेत असते;
पण समाधान हे महाकठीण कारण त्याला मनाचीच परवानगी लागते !

# ओरिसाच्या रथ यात्रेची कहाणी

*नुकतेच उडीसा मधील जगन्नाथाच्या रथयात्रेचे पर्व साजरे करण्यात आले. यावर प्रकाश टाकणारा रवी वाळेकर यांचा लेख - संपादक*

ओडिशा मोठे लोभसवाणे राज्य आहे. इथल्या लोकांची श्रद्धा, भाविकता मोहून टाकते. महाराष्ट्राच्या कमीत कमी चौपट सण येथे साजरे होतात. महाराष्ट्रात साजरे होणारे बहुतांश सगळे सण तर इथे आहेतच, पण मराठी माणसाला माहितीही नसणारे बरेच हिंदू सण इथे बघायला मिळतात. नुकताच पार पडलेला 'रोजोपर्बो' सण त्यातलाच! शब्दांच्या पहिल्या अक्षराला 'ओ' लावायच्या, तसेच 'व' चा उच्चार 'ब' असा करण्याच्या ओडिशी पद्धतीमुळे 'रजपर्व' या संस्कृत शब्दाचा उच्चार इथे 'रोजोपर्बो' असा होतो! (तसाच प्रकार माझ्या नावाबद्दलही होतो! सरळसाध्या 'रवी' या माझ्या नावाचा उच्चार इथे 'रोबि' असा करतात!)



रजपर्व म्हणजे पृथ्वीच्या मासिक पाळीचा (वार्षिक) सण! सारे ओडिशा या चार दिवसांत चक्क धरतीमातेच्या सेवेत खपते. या कालावधीत खणणे, नांगरणे, खुरपणे इतकेच काय; जमीनीला साधे ओरखडणे सुद्धा मंजूर नसते. या चार दिवसांच्या काळात लोक धरतीमातेची इतकी काळजी घेतात की, तिला त्रास होऊ नये म्हणून हे चार दिवस शेतात (नाईलाजाने जावेच लागले तर) अनवाणी जातात!

मराठी लोकांसाठी इथला असाच एक अनोळखी सण म्हणजे 'बालीजात्रा'. दरवर्षी कार्तिकी पौर्णिमेस हा सण सुरू होतो. हजारो लोक समुद्रकिनारी, नदीकाठी, तळ्यांजवळ जमतात आणि अक्षरशः लाखो कागदी होड्या पाण्यात सोडतात! बऱ्याचदा या होड्या लाकडी (आजकाल थर्माकोलच्या) असतात, त्यात दिवे पेटवून ठेवलेले असतात. जवळपास दोन सहस्रकांचा इतिहास आहे या उत्सवाला! मागच्या वर्षी कटक येथील शाळकरी मुलांनी एक नवाच इतिहास घडवला आणि गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये नाव नोंदवले. २२ शाळांच्या २२०० विद्यार्थ्यांनी ३५ मिनिटांत २२,००० कागदी होड्या इथल्या महानदीत सोडल्या! या सणाच्या नावातील 'बाली' या शब्दात खरोखरच्या 'बाली' या इंडोनेशियातील राज्याचाच उल्लेख आहे! एकेकाळी इथल्या लोकांचे आजच्या इंडोनेशियाशी (तेव्हाच्या 'यवद्विप'शी) व्यापारी संबंध होते आणि

याच दिवशी ते ओडिशातील (तेव्हाच्या 'कलिंग' राष्ट्रातील) पाराद्वीप या बंदरावरून बालीकडे कूच करायचे! या व्यापारांचा समुद्रावरचा प्रवास निर्विघ्न व्हावा आणि ते यशस्वी होऊन सुखरूप परत यावेत, यासाठी त्यांचे कुटुंबीय जगन्नाथाची करूणा भाकायचे. तेव्हापासून ही प्रथा सुरू झाली! ज्या स्त्रियांना अशी होडी बनवून प्रत्यक्ष नदीत वा समुद्रात सोडणे शक्य होत नाही, त्या या काळात अंगणात होडीची रांगोळी काढतात, आणि त्यात जगन्नाथाचे चित्र रेखाटतात!

जगन्नाथाचे अस्तित्व इथे सगळीकडे पदोपदी जाणवते. सकाळचा पहिला नमस्कारही 'जय जगन्नाथ' या जयघोषानेच होतो. आपल्यासारखे 'हाय', 'हॅलो', 'गुड मॉर्निंग ', 'नमस्कार', 'नमस्ते' ऐवजी सर्वसामान्य ओडिया व्यक्ती 'जय जगन्नाथ' म्हणणे पसंत करतात. कृष्णभगवान जगन्नाथाच्या रूपात 'जगन्नाथ पुरी' येथे वास्तव्य करतात, याची प्रचंड श्रद्धा आहे, नव्हे तसा विश्वासच आहे. ही श्रद्धा, हा विश्वास पुरीच्या मंदिरात तसा वर्षभर दिसतोच, पण त्याचा मोठा आविष्कार होतो तो आजच्या दिवशी! आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षातील द्वितीयेला! या दिवशी महाप्रभू (जगन्नाथाचे इथले लाडके नाव) प्रत्यक्ष मंदिराबाहेर पडून भक्तांना दर्शन देतात! सोबतीला मोठे बंधू बलभद्र आणि धाकटी बहीण सुभद्रा हेही असतात.

भगवंतांचे प्रत्यक्ष दर्शन घेण्यासाठी जगन्नाथ पुरी येथे ओडिशातील, देशभरातील लाखो भाविक जमतात. गेल्या काही वर्षांपासून परदेशी भाविकांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. या वर्षी दहा लाखांवर भाविक दर्शनासाठी पुरी येथे येतील, असा अंदाज आहे. एवढ्या मोठ्या संख्येने येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पुरी शहराच्या चार किलोमीटर दुरूनच वाहनांना बंदी घातली जाते. एवढ्या गर्दीत आणि एवढी पायपीट करूनही लाखो लोक रथयात्रा मार्गाच्या दुतर्फा भगवंताच्या प्रत्यक्ष दर्शनासाठी दोन दोन दिवस आधीपासून ठाण मांडून बसतात! भगवंतांचा थाट असतोच बघण्यासारखा, आयुष्यभर मनाच्या कुपीत जपून ठेवण्यासारखा!

तिघांचे तीन वेगवेगळे रथ! हे रथ भव्यदिव्य असतात. या रथांच्या भव्यतेचे वर्णन काय करावे? भगवान जगन्नाथाच्या रथाची उंची असते ४४.२ फूट! जवळपास चार ते पाच मजले उंच! हे रथ संपूर्ण लाकडाचे असतात आणि दरवर्षी नवे बनवले जातात. या रथांच्या बांधणीत कधीच खिळे वा कुठलाही धातू वापरत नाहीत. संपूर्ण लाकडी बांधणी. रथ बांधण्याचे काम बरोबर अक्षय तृतीयेच्या दिवशीच सुरू होते. शतकानुशतकांच्या परंपरा बदलायचा अधिकार कोणासही नाही. निरनिराळ्या आकारांच्या ८३२ लाकडी तुकड्यांना जोडून हा रथ बनवला जातो. जगन्नाथाच्या रथाला १६ चाके असतात, बलभद्राच्या रथाला १४, तर सुभद्रेच्या रथाला १२. या तिन्ही रथांना रंगीत कपड्यांचे आवरण असते. तीनही कपड्यांची रंगसंगतीही ठरलेली असते. सुभद्रेच्या रथासाठी लाल आणि काळा रंग, बलभद्राच्या रथासाठी लाल आणि निळसर हिरवा, तर जगन्नाथाच्या रथासाठी लाल आणि पिवळा. १२०० मीटर कपडा या आच्छादनासाठी वापरला जातो! या रथांना पुढे प्रतिकात्मक स्वरूपात चार लाकडी घोडे जुंपलेले असतात, पण हे रथ मात्र भाविकच ओढून नेतात! जगन्नाथाच्या रथाला ओढण्याचा मान मिळणे म्हणजे पूर्वजन्माचे पुण्यच! रथ ओढणे तर सोडाच; पण रथ ओढण्यासाठी जोडलेल्या दोरखंडाला स्पर्श करण्यासाठीही झुंबड उडते!

स्कंद पुराणात, पद्म पुराणात आणि ब्रह्मपुराणातही उल्लेख असलेली रथयात्रा 'याची देही याची डोळा' बघायला मिळणेच खूप. त्यात भगवंताच्या रथाला वा रथाच्या दोरखंडाला स्पर्श करायला मिळणे, हेच कित्येक भाविकांसाठी सुखाची अनुभूती असते! सर्वत्र जयघोष

चालू असते, चारही दिशांनी 'जय जगन्नाथ', 'जय जगन्नाथ' अशा घोषणा ऐकू येत असतात, ढोल नगारे वाजत असतात, मार्गावर लोक फुलांची उधळण करत नाचत असतात, वातावरण भाविकतेने भारून गेलेले असते. पुरीचा राजा (आता, राजसाहेबांचे या पिढीतील वंशज) सोन्याच्या झाडूने रथ आणि भगवान येणार तो मार्ग झाडतात. विधीवत पुजा आटोपून मंत्रोच्चारांच्या घोषात मंदिराच्या सिंहद्वारातून भगवान बाहेर येतात.

इतमामाने आणि आदरपूर्वक भगवंतांची प्रतिमा (मूर्ती) रथात विराजमान होते. भगवान जगन्नाथ उर्फ श्रीकृष्ण उर्फ विष्णू एका आठवड्यासाठी मंदिराबाहेर आलेले असतात. पुढचा एक आठवडा ते उत्तर दिशेला असलेल्या गुंडिचा मंदिरात मुक्काम करणार असतात!

जवळपास ३ किलोमीटर असलेल्या गुंडिचा मंदिरापर्यंतचा प्रवास करण्यासाठी रथाला पूर्ण दिवस लागतो! परततानाही तसेच. जायला यायला दोन दिवस आणि मुक्कामाचे ७ दिवस, असा ९ दिवसांचा हा सोहळा आहे.

मुळात भगवान मंदिर सोडून आठवडाभर बाहेर राहण्यासाठी का जातात? प्रश्न रास्त आहे आणि त्याची बरीच उत्तरे पण आहेत! काही तार्किक, काही मनोरंजक. मला आवडते ते एक गोंडस कारण. अतिशय श्रद्धा जाणवते त्या तर्कातून. होते असे की, मे महिन्याच्या कडक उकाड्यामुळे मंदिराच्या आतमध्ये देवसुद्धा त्रस्त होतात. ते गार पाण्याने आंघोळ करण्याची इच्छा व्यक्त करतात. ज्येष्ठ महिन्यातील पौर्णिमेला या भावंडांना मंदिराच्या उत्तर-पूर्वेला असलेल्या 'स्नानवेदी'वर १०८ कलश पाण्याने स्नान घातले जाते! बाहेर उघड्यावर आणि त्यातही थंड पाण्याने आंघोळ केल्यामुळे तिन्ही भावंडं आजारी पडतात! मग पुजारी गाभाऱ्यासमोर पडदा लावून वैद्यांकरवी उपचार सुरू करतात. पंधरा दिवसांनंतर तिघांनाही बरे वाटते! (या १५ दिवसांत भाविकांना मंदिरात दर्शन व्यर्ज असते!). आता या कथेत पुढे दोन फाटे फुटतात. एक तर्क असा की, आजारपणातून उठल्यामुळे भगवंतांना हवापालट करायचा असतो. दुसरा तर्क असा की, आजारपणात तोंडाची चव गेलेली असल्याने तिघाही भावंडांना जवळच रहात असलेल्या त्यांच्या मावशीच्या हातचा 'पोडा पिठा' खायची इच्छा होते, म्हणून ते बाहेर पडतात!

मला फार आवडतात अशा आख्यायिका. व्यवहार वा खऱ्याखोट्याची कसोटी न लावता, अशा आख्यायिका ऐकाव्यात. त्यात मनस्वी निष्पापपणा भरलेला असतो. देवांना गरम होणे, त्यांना गार पाण्याने आंघोळ करावी वाटणे, ते माणसांसारखेच आजारी पडणे, त्यांना मावशीच्या हातचा खाऊ खाणे वाटणे, या सगळ्यांत एक निरागसता आहे. देवांना त्यांचा पूर्ण मान देऊनही भक्त त्यांना मानवाच्या पातळीवर आणायचाही प्रयत्न करतात.

तीन रथांमध्ये तिघेही विराजमान होतात. सर्वांत पुढे बलभद्राचा 'तालध्वज' रथ, मध्ये सुभद्रेचा 'पद्मध्वज' रथ आणि मागे जगन्नाथाचा 'नंदिघोष'. भक्तांचा जयघोष आता आकाश फाटेल एवढा वाढलेला असतो. समोर रथात प्रत्यक्ष भगवान दर्शन देत असल्याने शिगेला पोहोचलेला असतो. सगळे दोरखंडाला भिडतात आणि ताकदीने रथ खेचू लागतात, पण रथ तसुभरही सरकत नाही! कितीही अतिरिक्त कुमक मागवली, तरी रथ जागचा हलत नाही. वर्षानुवर्षे असे होते. कितीही ताकद लावा, रथ हलत नाही.

इथे समजते ती एक आगळीच आणि चमत्कारीक प्रथा. प्रयत्नांची शर्थ करूनही रथ हलत नाही म्हटल्यानंतर दोर पकडणारे भक्त शिव्या देऊ लागतात! देवाचा रथ ओढणारे चक्क जाहीरपणे शिव्या देतात! धक्कादायक

आहे ना? पण तसे आहे. धक्का जरा कमी बसतो, ते या शिव्या स्वतःलाच द्यायच्या असतात हे समजल्यावर! काही जण 'मी वेडा', 'मी हलकट' पासून सुरुवात करून स्वतःला पार फुल्याफुल्यांच्या शिव्यांपर्यंत पोहोचतात, आणि रथाची चाके हलायला लागतात!

जेवढ्या भाविकांनी काही वेळापूर्वी रथ हलवायचा अयशस्वी प्रयत्न केलेला असतो, तेवढेच भाविक - हो, तेवढेच - शिव्या दिल्यानंतर मात्र रथ लिलया ओढतात! चमत्कारिक आहे हे. याचे शास्त्रीय कारण काय हे मला माहिती नाही आणि ही प्रथा कधी सुरू झाली, हे माझ्या ओडिया मित्रांना माहिती नाही!

याहून जास्त आश्चर्य पुढे वाटते. रथयात्रा चालू झालेली असते, लोक जोशात तो अवजड रथ ओढत असतात (देवाच्या प्रतिमेव्यतिरीक्त शंभर एक लोक असतात रथांमध्ये!) चांगली चालू असलेली रथयात्रा एका ठिकाणी आवर्जून थांबते.

रथयात्रा काही वेळ थांबते ती एका मुस्लीम व्यक्तीच्या कबरीपाशी!

सालाबेगच्या कबरीपाशी! (इथले मुस्लीमही कबर न म्हणता 'सालाबेगची समाधी' असा शब्दप्रयोग करतात)

एका मुस्लीम व्यक्तीच्या कबरीपाशी चक्क भगवान जगन्नाथ दर्शन देण्यासाठी थांबतात!

एका मुस्लीम सुभेदाराच्या पोटी जन्माला आलेला हा मुस्लीम मुलगा जगन्नाथाच्या भक्तीत लीन झाला. त्याने जगन्नाथावर बरेच अभंग रचले, त्यातले कित्येक आजही ऐकिवात येतात. महाप्रभूंच्या दर्शनासाठी कासावीस होऊन हा भक्त पुरीला येतो, पण मुस्लीम असल्याने त्याला मंदिरात प्रवेश नाकारला जातो! (पुरीला आजही हा नियम लागू आहे. फक्त रथयात्रेच्या काळात हिंदूव्यतिरीक्त इतर धर्मियांना मंदिरात प्रवेश आणि दर्शनाची परवानगी मिळते) नाराज झालेला सालाबेग कृष्णाच्या आराध्येसाठी पायी पायी वृंदावन गाठतो. तिथे हिंदू साधूंबरोबर कृष्णभक्तीत रमतो. काही दिवस सरतात. रथयात्रा जवळ आलेली असते. रथयात्रेत प्रभूंचे दर्शन शक्य! मग हा पायी वृंदावनहून पुरीला निघतो. रस्त्यात भयंकर आजारी पडतो. चालणेही अवघड. महाप्रभूंचे दर्शन परत वर्षभर टळणार! एक वर्ष खूप मोठा कालावधी. इथे मरण समोर दिसत होते! तो जगन्नाथाची करूणा भाकतो, 'हे जगन्नाथा, रथयात्रा सुरू असताना मी येऊ शकत नाहीये. मी प्रयत्न करतोय, पण कृपा कर आणि मी येईपर्यंत पुरीच्या मंदिरात परतू नकोस!'

कहाणी खरी खोटी माहिती नाही, पण १६३४-३५ च्या दरम्यान गुंडिचा मंदिर ते जगन्नाथ पुरी मंदिर या परतीच्या प्रवासात रथ थांबला. हजारो लोकांनी प्रयत्न करूनही रथ थांबला. हलेचना!

नंतर सालाबेगने याच स्थळावर बसून जगन्नाथावर अनेक अभंग, भक्तिगीते लिहिली आणि वारसांना सांगितले की, 'माझ्या मृत्यूनंतर मला याच जागी पुरवायचे आणि माझी समाधी याच जागी बांधायची! मृत्योपरांत काय होते माहिती नाही, पण माझा आत्मा टिकलाच, तर मला दरवर्षी जगन्नाथाचे दर्शन होईल!'

या अशा भक्तासाठी जगन्नाथ दरवर्षी त्याच्या कबरीपाशी थोडा वेळ थांबून त्याला मनसोक्त दर्शन देतात!

गुंडिचा मंदिरात पोहोचेस्तव उशीर झालेला असतो, मग भगवान जगन्नाथ तिथे प्रवेश करत नाहीत. ते रात्री रथातच झोपतात आणि दुसऱ्या दिवशी गुंडिच्या मंदिरात प्रवेश करतात.

या मंदिरात प्रभूंचे जे दर्शन होते, त्याला अतिशय शुभ मानले जाते. याचे कारण प्रभू जगन्नाथ सहलीला आल्यामुळे अतिशय 'रिलॅक्स' आणि चांगल्या 'मूड'

मध्ये असतात! इथले एक वैशिष्ट्य म्हणजे फक्त इथे आल्यानंतरच जगन्नाथाची पूजा अर्चना ब्राह्मणांकडून होते! जगन्नाथपुरीतील पुजारी जातीने ब्राह्मण नसतात आणि नाहीत!

इथल्या मुक्कामातील प्रभूंची खरी मजा पुढे आहे!

जगन्नाथ म्हणजे कृष्ण. कृष्ण हा विष्णूचा अवतार. त्यामुळे जगन्नाथपुरीच्या मंदिरात लक्ष्मी आहेच! या छोट्या 'टूरवर' निघताना जगन्नाथ पुजाऱ्यांना आदेश देतात की, 'मी रथयात्रेला निघण्याआधी लक्ष्मीच्या गाभाऱ्याला कडी लावा.' पुजारी भगवंतांचे ऐकतातच. इकडे भगवान भावाबहिणीबरोबर सहलीला निघालेत, आणि लक्ष्मीजींना पत्ताच नाही!

रथयात्रा सुरू झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी लक्ष्मीदेवीला याचा पत्ता लागतो! तिचा संशय की, हा रासलीला करायला गेला!

रागारागाने देवी लक्ष्मी पंचमीच्या दिवशी (रथयात्रा द्वितीयेला सुरू होते) झाडाझडती घ्यायला गुंडिचा मंदिरात पोहोचते!

इथले पुढचे फार सुंदर आहे! जगन्नाथाची मूर्ती बाहेर आणून नृत्यमंडपात ठेवली जाते. लक्ष्मीची मूर्ती तिथेच त्यांच्यासमोर. दोघेही भांडत आहेत! मूर्ती असल्याने जगन्नाथ/विष्णू तर्फे पुजारी त्याची बाजू मांडतात आणि लक्ष्मीतर्फे काही देवदासी!

त्या देवदासी त्या क्षणी खरोखरच लक्ष्मी वाटतात हे विशेष!

आपल्यासारखेच त्यांचे होते. 'चार-पाच दिवसांत परततो' असे विष्णू (जगन्नाथ) सांगतो. लक्ष्मी तत्क्षणी मान्य करते आणि परत निघते. गुंडिचा मंदिराबाहेर पडतानाही तिचा संताप कायम असतो (नवरा नणंदेबरोबर सहलीला गेलाय, तेही न सांगता!)

ती बाहेर पडताना आपल्या एका सैनिकाला जगन्नाथाच्या रथाला इजा करायला सांगते. तो सैनिक जगन्नाथाच्या रथाचे एक चाक तोडतो! (या चाक तोडण्याचा मोठा समारंभ आजही होतो!) याचमुळे जगन्नाथाच्या रथाला निघताना १७ चाके असतात! (मी आधी १६ चाके असतात, असे लिहिलंय)

एक चाक तोडले, हे भगवंतांच्या लक्षात आले तर खैर नाही, म्हणून देवी लक्ष्मी गुपचूप गोंडिचा मंदिरातून जगन्नाथपुरीच्या मंदिरात पोहोचते. थाटामाटात सहा तास मिरवणुकीत एक रथातून जगन्नाथापुरीहून 'गुंडिचा' मंदिरापर्यंत आलेली लक्ष्मी माता परत जाताना एका 'बोलेरे'तून गेलेली मी पाहिलीय! दहाव्या मिनिटाला घरी!

आठवडा संपतो. घरी परतायची देवांना/ भावंडांना ओढ लागते. रथ परत निघतो. भाविकच हा रथ पण ओढणार असतात. एका ठिकाणी थांबावे लागते. 'माय मरो, मावशी जगो' असे उगाचच नाही म्हणत आपल्याकडे. रस्त्यात 'मौसी मा टेम्पल' म्हणून एक जागा आहे. तिथे रथयात्रा आणि जगाचे नाथ येथे स्वतः चक्क ३ तास थांबतात!

मावशीकडून यथेच्छ 'पोडा पिठा' वर ताव मारतात (आपला अनारसा सदृश पदार्थ) आणि जगन्नाथपुरीच्या आपल्या घरी परततात!

आयुष्य सुंदर आहे, आपल्याला साले असे सगळ्यांवर विश्वास ठेवणारे भाविक व्हायला जमले पाहिजे!

**- रवी वाळेकर**
ज्येष्ठ लेखक
पुणे

●●●

---

कधी कधी देव तुमची परिस्थिती बदलत नाही; कारण त्याला तुमची मन:स्थिती बदलायची असते !

# परिसर वार्ता

**– संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

### आंतरराष्ट्रीय योग दिन

दरवर्षीप्रमाणे दि.२१.०६.२०२४ हा दिवस यंदा १०वा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून सौ. ए. के. जोशी शाळेच्या प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी अगदी उत्साहाने साजरा केला. शारीरिक, मानसिक व भावनिक संतुलन राखण्यासाठी योग कसा उपयुक्त ठरतो व आरोग्यदायी जीवन शैलीसाठी त्याचा कसा उपयोग केला जाऊ शकतो यासाठी दररोज योगा करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. इ. पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना योग प्रात्यक्षिके, योग व परिसंवाद इत्यादी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### चित्रकला स्पर्धा

दिवंगत रोशन जाल पटेल यांच्या स्मृती प्रीत्यर्थ आयोजित चित्रकला स्पर्धेचा अहवाल

कार्यक्रमाचा आढावा

शाळेत इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांसाठी दिवंगत रोशन जाल पटेल यांच्या स्मृती प्रीत्यर्थ चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. हा कार्यक्रम २५ जून २०२४ रोजी शाळेत पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि कलात्मक कौशल्ये वाढवण्यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला.

एक तासाच्या उत्साही चित्रकलेनंतर, परीक्षकांनी चित्रांचे परीक्षण केले व निकाल जाहीर करण्यात आले आणि विजेत्यांना पुढीलप्रमाणे प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

| | |
|---|---|
| **इयत्ता १ ली** | |
| **प्रथम पारितोषिक** | अ) गजरे दिविजा धनंजय |
| | ब) बागल मुग्धा मनोज |
| | क) पाष्टे मीरा प्रीतम |
| **द्वितीय पारितोषिक** | अ) खोल्लम शर्वरी संदीप |
| | ब) म्हात्रे सानवी विनीत |
| | क) दरवाडे ज्ञानदा योगेश |
| **तृतीय पारितोषिक** | अ) कुलकर्णी मानव निरंजन |
| | ब) सनांसे दिया मनोज |
| | क) निजसुरे जाई मनोज |
| **इयत्ता २ री** | |
| **प्रथम पारितोषिक** | अ) उतेकर शुभा विजय |
| | ब) गायकवाड नीलाक्षी राकेश |
| | क) गंद्रे नियांश निखील |
| **द्वितीय पारितोषिक** | अ) मनवाल श्रिया राकेश |
| | ब) मराठे ओवी मयुरेश |
| | क) घुले प्रियल संदीप |
| **तृतीय पारितोषिक** | अ) बापये अनुश्री अक्षय |
| | ब) सोहोनी तेजश्री संतोष |
| | क) परब अन्विता शशांक |
| **इयत्ता ३ री** | |
| **प्रथम पारितोषिक** | अ) पैठणकर रेवा राहुल |
| | ब) निर्गुण निरजा स्वप्नील |
| | म) भुजबळ यशिका महेश |
| **द्वितीय पारितोषिक** | अ) केतकर भाग्य अक्षय |
| | ब) म्हात्रे शुभम जयेश |
| | क) गोरीवाले समीक्षा समीर |

| | |
|---|---|
| **तृतीय पारितोषिक** | अ) शितप आरंभ नीतिन<br>ब) कोळी विरिका मच्छिंद्र<br>क) मोदगी मैत्रेयी मयुरेश |
| | **इयत्ता ४ थी** |
| **प्रथम पारितोषिक** | अ) फारिया नवांश किशोर<br>ब) आरते युवान संतोष<br>क) खेडेकर कृतिका समीर |
| **द्वितीय पारितोषिक** | अ) बामणे आरोही मंगेश<br>ब) कडव ओम सचिन<br>क) कावळे नीरजा प्रथमेश |
| **तृतीय पारितोषिक** | अ) कोळपकर ओवी निलेश<br>ब) लोणे जेनिता जितेंद्र<br>क) निगुडे ओवी नलीन |

चित्रकला स्पर्धा अत्यंत यशस्वी ठरली, विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग आणि या कार्यक्रमाने दिवंगत रोशन जाल पटेल यांच्या स्मृतीला आदरांजली वाहिली आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्जनशीलतेला व्यक्त करण्यासाठी एक व्यासपीठ दिले.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

इयत्ता १०वी च्या परीक्षेत प्रथम आलेले १० विद्यार्थी (मार्च-२०२४)

कुमारी अनुष्का वैभव काळे - कला प्राविण्यात प्रथम

कुमार भविष्य गाला - शैक्षणिक गुणवत्तेत प्रथम

| अनु क्र. | विद्यार्थ्यांची नावे | % | क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | काळे अनुष्का वैभव | १०० | १ |
| २ | देवस्थळी पार्थ दीप्ती | ९९.२ | २ |
| ३ | वाजे मिहिका योगेश | ९७.८ | ३ |
| ४ | पाटील ऋजुला अमित | ९७.६ | ४ |
| ५ | पाटणेकर स्वानंदी सुबोध | ९६.६ | ५ |
| ६ | कुलकर्णी देवश्री प्रशांत | ९६.६ | ५ |
| ७ | देसाई चिन्मय नागेश | ९६.२ | ६ |
| ८ | गाला भविष्या राकेश | ९६ | ७ |
| ९ | चिले स्वराज सूर्यकांत | ९५.६ | ८ |
| १० | जोगळेकर तन्मय चैतन्य | ९५.६ | ८ |
| ११ | इंदप आदित्य प्रसाद | ९५.६ | ८ |
| १२ | झुंजारराव सोहम किशोर | ९५.४ | ९ |
| १३ | देवघर अवनी हृषिकेश | ९५.२ | १० |
| १४ | वाळिंबे अनुष्का अभय | ९५.२ | १० |



आमची विद्यार्थिनी कु. स्वरा हंजनकर (वय ११ वर्ष) हिने श्रीलंकेच्या तलाईमनार ते भारतच्या धनुष्यकोडी (रामसेतू या नावाने प्रसिद्ध) पर्यंतचे २३ किमीचे अंतर यशस्वीरित्या पोहून इतिहास रचला आहे. सौ. ए. के. जोशी शाळेतर्फे तिच्या या आंतराष्ट्रीय कामगिरी बद्दल तिचे अभिनंदन. अर्जुन पुरस्कार व शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या आमच्या माजी विद्यार्थिनी आरती प्रधान यांनी स्वराला या संपूर्ण प्रकल्पामध्ये मार्गदर्शन केले आहे.

## जोशी बेडेकर कला वाणिज्य (स्वायत्त)

२० जून २०२४ रोजी कला प्रथम वर्षीय प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी NEP २०२० संवेदीकरण आणि विषय निवड समुपदेशन सत्र घेण्यात आले. विद्यार्थ्यांना NEP २०२० आणि वर्टीकल बद्दल माहिती करून देणे विभागातील विविध विषयांच्या संयोजनाविषयी माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचे निराकरण करण्यात आले. उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर यांनीही NEP २०२० च्या महत्त्वाच्या मुद्यांवर प्रकाश आणि सत्राचे स्वागत केले. सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत कात्यायन सभागृह येथे सदर सत्र घेण्यात आले. यात उपस्थित विद्यार्थ्यांची संख्या १०९ एव्हढी होती. प्रभारी शिक्षक प्रा.नीता पाठक, प्रा.शिवाजी नाईक आणि प्रा. स्वाती भालेराव यांनी या सभेचे आयोजन केले होते.

### आंतरराष्ट्रीय योग दिवस २०२४

जिमखाना आणि क्रीडा अकादमी, विवेकानंद अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, NSS, DLLE आशीर्वाद फाऊंडेशनचे योग प्रशिक्षक यांच्या समन्वयाने दिनांक शुक्रवार, दि. २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. यात जवळपास ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यांची एकाग्रता कौशल्ये वाढवण्यासाठी संवाद आणि ओंकार साधना सत्र घेण्यात आले आणि विविध योगासने करवून घेण्यात आली. यासाठी डॉ. प्रमोद खराटे, डॉ. संगीता दास, डॉ. विनोद चांदवानी, डॉ. ऊर्मिला शेटवे अथक परिश्रम घेतले. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांचे मार्गदर्शन लाभले.

दि. १ जुलै २०२४ रोजी एन.एस.एस. कक्षातर्फे ठाणे महानगर पालिका आणि मुंबई विद्यापीठ ठाणे परिसरातर्फे वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यात एकूण ३२ विद्यार्थी सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी श्री अशोक शिनगारे, मुंबई विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. रवींद्र कुळकर्णी, प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांच्या मदतीने ६२ झाडे लावण्यात आलीत. डॉ. विनोद चंदवानी – NSS प्रमुख आणि प्रा. रुपेश महाडिक यांनी सदर कार्यक्रमास यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतलेत.

NEP अंमलबजावणी कक्षातर्फे प्राचार्या डॉ.सुचित्रा नाईक याच्या मार्गदर्शनाने फील्ड प्रकल्पावर कार्यशाळा मंगळवार, २ जुलै २०२४ आयोजित करण्यात आली होती. एनईपी २०२०अंतर्गत, द्वितीय वर्षाच्या पदवीपूर्व कार्यक्रमाच्या अभ्यासक्रमात फील्ड प्रकल्पाचा समावेश करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने कार्यशाळा घेण्यात आली आणि यात पुढील मुद्यांवर चर्चा करण्यात आली. १) फील्ड प्रकल्पाचे विषय निवडण्याचे नियम २) फील्ड प्रकल्पाची रचना ३) फील्ड प्रकल्पाचे मूल्यमापन नमुना आदी.

विनामूल्य आरोग्य दृष्टी शिबिर गुरुवार ४ जुलै २०२४ रोजी गाडगीळ नेत्रालयाच्या सहकार्याने IQAC, NSS आणि जिमखाना यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत व्हिजन वेलनेस कॅम्प चे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी व कर्मचाऱ्यांनी याचा लाभ घेतला.

मल्टीमीडिया आणि जनसंवाद विभागा तर्फे विधानसभेला भेट दिली SY आणि TYBAMMC इंग्रजी, मराठी (पत्रकारिता) आणि MACJ भाग II- च्या विद्यार्थ्यांनी शुक्रवार, ५ जुलै २०२४ रोजी दुपारी १ ते ४ या वेळेत विधानभवन मुंबई येथे भेट दिली. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्याशी संवाद साधला. यात एकूण ७० विद्यार्थी सहभागी झाले

होते. कार्यक्रमाचा उद्देश–विद्यार्थ्यांना विधानसभा आणि विधानपरिषद– यांच्या थेट अधिवेशनाची माहिती देणे. विद्यार्थ्यांना संसदीय कामकाजाच्या अहवालाचे ज्ञान देणे. या भेटीची संधी घडवून आल्याबद्दल डॉ. मुग्धा केसकर यांचे विशेष आभार आणि उपप्राचार्य डॉ. महेश पाटील आणि समन्वयक यांच्या प्रयत्नाने ही भेट खूप यशस्वी झाली.

मल्टीमीडिया आणि जनसंवाद विभागाने मुंबई मराठी पत्रकार संघाला भेट दिली. TYBAMMC इंग्रजी, मराठी आणि MACJ भाग II- चे विद्यार्थी यात सहभागी झाले होते. शुक्रवार ५ जुलै २०२४ रोजी श्री संदीप चव्हाण, ज्येष्ठ क्रीडा पत्रकार, कु. स्वाती घोसाळकर, पत्रकार संघाचे उपाध्यक्ष व राजेंद्र हुंजे यांच्याशी विद्यार्थ्यांनी संवाद साधला. ७० विद्यार्थ्यांना लाभ झाला. – कार्यक्रमाचा उद्देश – लाइव्ह रिपोर्टिंगमधील आव्हाने, क्रीडा पत्रकारिता, महिला पत्रकारांसाठीच्या संधी या विषयावर संवादात्मक सत्र घेण्यात आले. उपप्राचार्य डॉ. महेश पाटील आणि समन्वयक यांचे या भेटीस मोलाचे मार्गदर्शन लाभले.

संस्कृत विभागातर्फे दिनांक ६ जुलै शनिवार रोजी आषाढाचा पहिला दिवस, महाकवी कालिदास दिन साजरा करण्यात आला. विभागाच्या विद्यार्थ्यांनी यावेळी महाकवी कालिदासांच्या नायिका या विषयावर कार्यक्रम सादर केला. कालिदास दिवस ही विद्यार्थ्यांसाठी एक प्रसिद्ध संस्कृत कवी आणि नाटककार कालिदासाच्या कार्याचा आणि वारशाचा अभ्यास करण्याची संधी आहे. त्याच्या साहित्याचा अभ्यास करून, विद्यार्थी सखोल समजून घेऊ शकतात: कालिदासाच्या कृती भारतीय तत्त्वज्ञान, पौराणिक कथा आणि सौंदर्यशास्त्रातील मौल्यवान अंतर्दृष्टी देतात. त्यांच्या लेखनाचा शोध घेऊन, विद्यार्थी भारताच्या समृद्ध साहित्यिक आणि सांस्कृतिक वारशाची खोलवर माहिती मिळवू शकतात. या उद्देशाने हा दिवस साजरा करण्यात आला. प्रा. स्वाती भालेराव आणि प्रा. श्रेया मोघे यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

DLLE आणि NSS SURGE च्या सहकार्याने SURGE २२ वा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने SURGE – माजी विद्यार्थी संघटना, DLLE आणि NSS युनिट ने रविवार, ७ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता नवदुर्गा आश्रम (वृद्धाश्रम), बदलापूर येथे भेट देण्यात आली श्रीमती उमा भंडारी (नवदुर्गा आश्रमाच्या संस्थापक) यांनी नवदुर्गा वृद्धाश्रमाची माहिती दिली. त्यांच्याशी 'भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा' या विषयावर संवाद साधण्यात आला. माजी विद्यार्थ्यांच्या मदतीने पिंपळ, केळी, अडुळसा, कडुनिंब, लाल आणि गुलाबी हिबिस्कस, सोनचाफा इत्यादी एकूण २० नमुने आश्रम परिसरात लावण्यात आले. सहाय्यक प्रा. स्वप्नील मयेकर, डॉ. संगीता मोहंती - DLLE प्रमुख, डॉ. विनोद चंदवानी – NSS Prog.Off. यांनी यासाठी अथक प्रयत्न केलेत. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या आशीर्वादाबद्दल SURGE ने कृतज्ञता व्यक्त केली. SURGE DLLE आणि NSS स्वयंसेवकांच्या सहभागाचे आणि सहभागाचे कौतुक करण्यात आले.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

१ जून २०२४ रोजी CDC आणि IQAC बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठक ही महाविद्यालयाच्या IQAC रुम व कॉन्फरन्स रुममध्ये घेण्यात आली.

**माजी विद्यार्थी डॉ. गोपिचंद खाडे – विशेष प्रमाणपत्र:**

माजी विद्यार्थी डॉ. गोपिचंद खाडे, सहाय्यक सरकारी वकील, यांना अलीकडेच संयुक्त राष्ट्र आर्थिक



आणि सामाजिक परिषदेमधून फॉरेन्सिक सायकोलॉजी मध्ये डिप्लोमा यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले आहे. आम्ही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.



Certificate No. UN799778

Redg No. 436

ECOSOC

UNDP

**Certificate of Appreciation**

This is to Certify that

**DR. GOPICHAND KHADE**

having followed an approved course of study at Your Hope Line - World Counseling Center has satisfied all the conditions perscribed by the statutes of the Institution on 26th June 2024 and hereby Awarded the Degree of

**Diploma in Forensic Psychology**

Liz Huckerby — Suveen Kumar, PhD

DIPLOMA

मुंबई विद्यापीठाच्या नियमानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ या वर्षाचा महाविद्यालय विकास समितीचा (CDC)वार्षिक अहवाल मुंबई विद्यापीठात सादर करण्यात आला.

**५ जून २०२४ वृक्षारोपण कार्यक्रम :**

वि.प्र.मं.चे टी.एम.सी विधी महाविद्यालयात वृक्षारोपणाचा कार्यक्रम साजरा ५ जून २०२४ रोजी, विप्रमंचे टीएमसी विधी महाविद्यालयात, ठाणे आणि ठाणे जिल्हा व सत्र न्यायालय यांनी, आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिनानिमित्त, विद्या प्रसारक मंडळाच्या प्रांगणात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाला ठाणे जिल्हा न्यायालयातील तीन मान्यवर न्यायाधीश, श्री ईश्वर के. सूर्यवंशी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, तसेच सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, श्री एस. के. फोकमारे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, आणि श्री. ए. सी. डोईफोडे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांची उपस्थिती होती. त्यांच्यासह डॉ. श्रीविद्या जयाकुमार, प्रभारी प्राचार्या, विधी महाविद्यालय, डॉ. विंदा मांजरामकर, प्राचार्या बी.एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, टीएमसी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे श्री राजू जाधव आणि कमांडिंग ऑफिसर कर्नल मन्नत हुसेन देखील उपस्थित होते. यावेळी ४०० NCC च्या विद्यार्थ्यांनी वृक्षारोपणात मदत करून पर्यावरणाविषयी त्यांची बांधिलकी दाखवून कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला. पर्यावरणीय शाश्वतेला चालना देणे आणि हवामान बदलाचा सामना करण्यासाठी वृक्ष लागवडीच्या महत्त्वाविषयी जागरूकता वाढवणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. यावेळी विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व आणि हरित भविष्य घडवण्यासाठी शैक्षणिक संस्था काय भूमिका बजावू शकतात यावर प्रकाश टाकला. यानंतर ठाणे न्यायालयातील तिन्ही माननीय न्यायमूर्तींनीही विद्यार्थ्यांना संबोधित करताना केवळ झाडे लावणेच नव्हे तर त्याचे संवर्धन करण्याचे महत्त्व सांगितले. यावेळी हिरवेगार, उज्ज्वल आणि निरोगी भविष्याच्या सकारात्मक आशेने महाविद्यालयाच्या आवारात रोपटे लावण्यात आल्याचे सांगण्यात आले. प्रा.कृष्णा कामथ यांनी आभार प्रदर्शन केले.



तुमचा आजचा संघर्ष तुमचे उद्याचे सामर्थ्य निर्माण करतो;
त्यामुळे विचार बदला म्हणजे तुमचे आयुष्य बदलेल!

**विविध निकाल घोषीत :-**

१ जून रोजी तृतीय आणि प्रथम सत्राच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले.

१८ जून रोजी तृतीय आणि प्रथम सत्राच्या पुनर्मूल्यांकनाचा निकाल जाहीर झाला.

**१३ जून रोजी वार्षिक क्रीडा आणि सांस्कृतिक पारितोषिक वितरण समारंभ:**

वि.प्र.मं.चे ठाणे महापालिका विधी महाविद्यालयासाठी शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ साठी वार्षिक क्रीडा आणि सांस्कृतिक पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम संध्याकाळी ६.०० वाजता प्रा. कृष्णा कामत यांच्या प्रस्तावनेने सुरू झाला आणि त्यानंतर पुढील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विवेक पाटील (द्वितीय वर्ष विद्यार्थी ) आणि सुश्री मनीषा झिटे (तृतीय वर्ष विद्यार्थी) यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयाकुमार, प्रा. विनोद वाघ, प्रा. हेतल मेशेरी, प्रा. कृष्णा कामत, प्रा. अंबर जोशी, ग्रंथपाल श्रीमती शीतल सोनवणे आणि ग्रंथपाल सहाय्यक श्री. शुभम पवार उपस्थित होते.

खालील स्पर्धांसाठी पारितोषिकांचे वितरण करण्यात आले:

१. फ्रेशर डिबेट स्पर्धा

२. फ्रेशर अभिरुप न्यायालय स्पर्धा

३. सावित्रीबाई फुले वक्तृत्व स्पर्धा

४. वार्षिक क्रीडा स्पर्धा

५. वार्षिक सांस्कृतिक स्पर्धा

रिअल इस्टेट कायद्यांवरील ॲड-ऑन कोर्समध्ये सहभाग घेणाऱ्या आणि उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच विधी साहाय्य कक्षात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचेही वितरण करण्यात आले. पारितोषिक वितरणानंतर प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले आणि सर्व विद्यार्थ्यांना सर्व स्पर्धांमध्ये सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहक भाषण दिले. संध्याकाळी ७:३० वाजता सुश्री मनीषा झिटे यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.



**E.R.P प्रशिक्षण १२ जून :**

१५ जूनला आपत्ती व्यवस्थापन कायदा - प्रमाणपत्र कोर्सच्या परीक्षा घेण्यात आल्या.



**२६ जून २०२४ रोजी 'अंमली पदार्थांचे सेवन आणि अवैध तस्करी नियंत्रण' या विषयावर विशेष व्याख्यान आणि कायदेशीर मदत प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम:**

अंमली पदार्थांचे सेवन आणि बेकायदेशीर तस्करी विरुद्धच्या आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त, वि.प्र.मं. च्या ठा.म.पा. विधी महाविद्यालयाच्या कायदेशीर सहाय्य

कक्षाने २६ जून २०२४ रोजी वि.प्र.मं च्या कॅम्पसमधील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विशेष व्याख्यान आयोजित केले होते. ह्या विशेष व्याख्यानाला विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसह के.जी. जोशी कला महाविद्यालय आणि एन.जी. बेडेकर वाणिज्य महाविद्यालयाच्या एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी हजेरी लावली होती.

श्री ईश्वर सूर्यवंशी (दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ विभाग आणि सचिव, डीएलएसए, ठाणे), एपीआय जगदीश गावित आणि ठाण्याच्या नार्कोटिक्स सेलचे एपीआय नीलेश मोरे आणि ठाणे न्यायालयातील चार प्रशिक्षणार्थी न्यायाधीशांसह अनेक उल्लेखनीय प्रमुख वक्ते कार्यक्रमाला उपस्थित होते. सहाय्यक प्रा.श्री. विनोद वाघ यांनी प्रास्ताविक व प्रेरणादायी भाषण केले. आपल्या भाषणात, त्यांनी अंमली पदार्थांचा दुरूपयोग आणि अवैध तस्करी या गंभीर समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी या दिवसाच्या महत्त्वावर जोर दिला. नंतर प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार, यांनी स्वागत भाषण केले आणि अंमली पदार्थांचा दुरुपयोग आणि अवैध तस्करी यांचा सामना करण्यासाठी एकत्र काम करण्याच्या महत्त्वावर भर दिला. श्री. संजय भाटे (माजी जिल्हा व सत्र न्यायाधीश) यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे मनोगत व्यक्त केले. सरांनी सर्व तरुणांना राजर्षी शाहू महाराजांबद्दल अधिकाधिक वाचन करण्याचे आवाहन केले जेणेकरून त्यांच्या जीवनातून इतरांना प्रेरणा मिळू शकेल आणि त्यांना अंमली पदार्थांपासून दूर ठेवता येईल. व्याख्यानाचे प्रमुख पाहुणे एपीआय जगदीश गावित आणि नार्कोटिक्स सेलचे एपीआय नीलेश मोरे यांनी किशोरवयीन मुलांमध्ये वाढत्या अंमली पदार्थांच्या व्यसनाचे प्रमाण याविषयी सखोल माहिती दिली. त्यांच्या विचारांनी अंमली पदार्थांच्या व्यसनाधीनतेच्या वाढत्या प्रवृत्ती आणि अवैध अंमली पदार्थांच्या व्यापारामुळे भेडसावणाऱ्या समस्यांवर प्रकाश टाकला, ज्यामुळे श्रोत्यांना परिस्थितीचे गांभीर्य स्पष्टपणे समजले. माननीय न्यायाधीश श्री. ईश्वर सूर्यवंशी (दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ विभाग आणि सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे) यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून नंतर वि.प्र.मं. च्या ठा.म.पा. विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना कायदेशीर मदत कक्षात केलेल्या अथक योगदानाबद्दल प्रमाणपत्रे प्रदान केली. त्यांच्या उपस्थितीने या कार्यक्रमाला एक महत्त्वपूर्ण महत्त्व जोडले, संबोधित केलेल्या समस्यांच्या गंभीरतेवर आणि त्यांचा सामना करण्यासाठी आवश्यक असलेल्या सामूहिक प्रयत्नांवर जोर दिला. या कार्यक्रमाने जागरूकता वाढवण्यासाठी, अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी आणि अंमली पदार्थांचा दुरुपयोग आणि अवैध तस्करीमुळे निर्माण झालेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी सामूहिक जबाबदारीची भावना वाढवण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम केले. मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीसह महाविद्यालयीन समुदायाचा सक्रिय सहभाग आणि सहभाग, औषधमुक्त आणि सुरक्षित वातावरण निर्माण करण्याची वचनबद्धता अधोरेखित करते. कार्यक्रमाची सांगता प्रा.विनोद वाघ यांच्या आभार प्रदर्शनाने झाली, त्यांनी उपस्थित सर्व विद्यार्थी व मान्यवर पाहुण्यांचे आभार मानले.







चांगला गुरू यशाचे दरवाजे उघडून देऊ शकतो,
पण त्यातून यशाच्या दिशेने जाण्यासाठी स्वतःलाच चालावे लागते !...

- डॉ. श्री विद्या जयाकुमार दिनांक २६ जूनला UGC द्वारे नवीन कायद्यांवरील ऑनलाइन बैठकात उपस्थित होत्या.
- डॉ. श्री विद्या जयाकुमार १९ जून ते २३ जून २०२४ दरम्यान क्राइस्ट विद्यापीठ आणि गुजरात राष्ट्रीय कायदा विद्यापीठ द्वारे ऑनलाइन FDP या वर्गात सहभाग घेऊन यशस्वीरित्या पूर्ण केले.

वि.प्र.मं.चे टी.एम.सी विधी महाविद्यालयाचे प्रो. श्री. सुखराम झिंगर बिसेन यांना योग शिक्षक आणि मूल्यमापक म्हणून योग प्रमाणपत्र मंडळाद्वारे प्रमाणित करण्यात आले आहे. हे प्रमाणपत्र योग व्यावसायिकांच्या स्वेच्छा प्रमाणपत्रांतर्गत, आयुष मंत्रालय, भारत सरकारकडून प्रदान करण्यात आले आहे.




## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

दिनांक १ जुलै हा महाराष्ट्र राज्यात कृषी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. मा. मुख्यमंत्री सो., महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून ठाणे महानगरपालिका क्षेत्रात 'मुख्यमंत्री हरित ठाणे' योजना हाती घेण्यात आली. या योजनेअंतर्गत अधिकतम वृक्ष लागवडीकरिता ठाणे महानगरपालिकेद्वारे मंडळाच्या तंत्रनिकेतन व एनएसएस बा.ना. बांदोडकर सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने व ठाणे महानगरपालिकेच्या मार्गदर्शनाने विद्या प्रसारक मंडळाच्या 'ज्ञानद्विप' परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम १ जुलै रोजी संपन्न झाला. सदर कार्यक्रमाला मुख्य पर्यावरण अधिकारी सौ. मनिषा प्रधान, माननीय उपआयुक्त तंत्रनिकेतन व सायन्स कॉलेजचे प्राचार्य सोबत विद्यार्थी वर्ग उपस्थित होता. ठाणे महानगरपालिकेने २०० रोपे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिली आहेत.










## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

१ जून : सहा. प्रा. नील चव्हाण यांनी विपणन या विषयातील पीएच.डी. साठी, शैलेश जे. मेहता स्कूल ऑफ मॅनेजमेंट (आयआयटी बॉम्बे) येथे प्रवेश घेतला.

४ जून : चिपळूण येथील डी.बी.जे. कॉलेजच्या आयक्यूएसी आणि ग्रंथालय समितीने संयुक्तपणे, कोहा

कडू घोट प्रेमळ माणसाच्या हातून दिल्यास तो कमी कडू लागतो !

लायब्ररी सॉफ्टवेअर या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेसाठी ग्रंथपाल श्री. संजय सपकाळ यांना व्याख्याते म्हणून आमंत्रित करण्यात आले. या कार्यशाळेमध्ये डी. बी. जे. महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. सुधीर मोरे, महर्षी परशुराम कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, वेळणेश्वर चे ग्रंथपाल डॉ. संतोष चतुर्भुज, यांनी देखील कोहा या ग्रंथालय प्रणाली मधील विविध विभागावर सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत कोकण विभागातील विविध शैक्षणिक व सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथपाल आणि ग्रंथालय सेवक वर्ग यांनी कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला.



१७ जून : कर्मचारी विकास समितीच्या वतीने प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी 'इंटर-पर्सनल स्किल्स' या विषयावर सहा. प्रा. आदिती पवार यांनी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले.



२१ जून : डॉ. कांचन आणि डॉ. पल्लवी यांनी 'अत्यावश्यक जीवन कौशल्य' या विषयावर १ दिवसीय कार्यशाळा आयोजित केली.



२२ जून : प्रा. नील चव्हाण, डॉ. नीतिन जोशी आणि डॉ. श्रीपाद बापट यांनी संयुक्तपणे लिहिलेल्या शोधनिबंधाला सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च येथे आयोजित आंतरराष्ट्रीय शोधनिबंध सादरीकरण परिषदेत सर्वोत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कारासह रु.१०,०००/- चे रोख पारितोषिक मिळाले.



२६ जून : अंमली पदार्थांच्या सेवनाविरुद्ध जनजागृती आणि प्रतिबंधात्मक कारवाईचा उपक्रम, आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थांचा गैरवापर आणि अवैध तस्करी विरुद्ध दिनानिमित्त डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या एडीसी समिती तर्फे, सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी, सुश्री. वेदवती परांजपे यांचे अंमली पदार्थ व्यसन - कारणे आणि प्रतिबंध या विषयावर एक अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले.



२७ जून : डॉ. व्ही. एन. ब्रिम्स च्या एडीसी समिती तर्फे, (Use of Case Studies in Classroom). वर्गात केस स्टडीजचा वापर या विषयसूत्रावर एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेमध्ये अतिथी व्याख्याते, विवा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी चे संचालक; डॉ. हिरेश लोहार, यांनी उपस्थितांना संबोधित करून कार्यशाळेची उद्दिष्टे सांगितली व प्रमुख वक्ते, एक्स आय एम आर चे संचालक, डॉ. वैद्यनाथन के. एन., यांनी त्यांच्या समृद्ध अनुभवी ज्ञानासह सादरीकरण केले.

ब्रिम्स मधील सर्व एमएमएस विद्याशाखा सदस्य, तसेच मुंबई येथील विवा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आणि रिसर्च, राजीव गांधी कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, शीला रहेजा स्कूल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँड रिसर्च, लाला लजपतराय इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मधील मधील सर्व एमएमएस विद्या शाखा सदस्य देखील या कार्यशाळेमध्ये सहभागी झाले.





## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

दि.०१ मार्च २०२४ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या प्रा. भक्ती घोरपडे यांनी गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक बिचोलिम, गोवा येथे Arc GIS सॉफ्टवेअर वापरून पूर प्रवण क्षेत्र मॅपिंग वर अतिथी व्याख्यान डेमोसह दिले. विद्यार्थ्यांनी जीआयएस प्रणालीची संकल्पना आणि वास्तविक जगात जीआयएस प्रणाली कशी वापरावी याबद्दल ज्ञान यावेळी मिळाले.



दि.०४ मार्च २०२४ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थी संघटनेने (CESA) विभागातील सर्व विद्यार्थ्यांसाठी ऑफशोअर स्ट्रक्चर्सची रचना आणि विकास या विषयावर तज्ज्ञ व्याख्यान आयोजित केले होते. सर्वप्रथम ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य श्री. प्रफुल्ल पागनीस आणि श्री. अशोक यादव यांनी प्राध्यापकांच्या संवादासाठी आपला बहुमोल वेळ घालवला. त्यांनी त्यांचे कामाचे अनुभव प्राध्यापकांसोबत शेअर केले आणि प्रात्यक्षिकभिमुख अध्यापन शिक्षण सुधारण्याची सूचना केली. यावेळी श्री.अशोक कुमार यादव यांना ऑफशोअर स्ट्रक्चर्स या विषयावरील व्याख्यानासाठी संसाधन व्यक्ती म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी ऑफशोअर स्ट्रक्चर्समध्ये फील्ड वर्क करतानाचे त्यांचे अनुभव स्पष्ट केले. संकल्पना तयार करण्यापासून ते प्रकल्पाच्या संरचनेपर्यंतच्या विविध टप्प्यांवर त्यांनी चर्चा केली.



दि.०५ मार्च २०२४ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांनी जल संसाधन अभियांत्रिकीशी संबंधित इंट्रा कॉलेज आयडिया आणि मॉडेल सादरीकरणाचे आयोजन केले. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य श्री.अशोक कुमार यादव, श्री.प्रफुल्ल पागनीस यांना परीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले. श्री.प्रफुल्ल पागनीस आणि श्री अशोक कुमार यादव यांनी यावेळी माहिती सामायिक केली तसेच मॉडेल वाढविण्यासाठी काही कल्पना सुचवल्या.



दिनांक १२ व १३ एप्रिल रोजी महाविद्यालयातील यांत्रिक अभियांत्रिकी विभागाच्या वतीने तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील घडामोडींवर राष्ट्रीय परिषद पार पडली. भारतीय तंत्र शिक्षा संस्थेच्या (ISTE) सहयोगाने राष्ट्रीय भविष्यवादी अभियांत्रिकी आणि अनुप्रयुक्त शास्त्र परिषद (NCFTEAS) २०२४ चे आयोजन करण्यात आले. या परिषदेमध्ये देशभरातील तसेच एनआयटी दिल्ली, वीआयआयटी पुणे, सीओईपी तंत्र विद्यापीठ पुणे, एनआयटी दुर्गापूर या सारख्या संस्थांच्या विद्यार्थी आणि संशोधकांचे एकूण १०३ शोधनिबंध सादर केले गेले. या परिषदेद्वारे अभियांत्रिकी आणि अनुप्रयुक्त शास्त्राच्या क्षेत्रातील आगामी ट्रेंड्स, संशोधन आणि नावीन्यपूर्ण संकल्पनांवर चर्चा आणि माहितीची देवाण-घेवाण झाली. यामुळे या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि विद्यार्थ्यांसाठी ही परिषद उपयुक्त ठरली. या परिषदेच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून विद्या प्रसारक मंडळ ठाणेचे डॉ.विजय बेडेकर, डॉ.चंद्रहास हांडा (संचालक, विदर्भ तंत्रज्ञान संस्थान, नागपूर व अध्यक्ष, तांत्रिक समिती, ISTE) आणि विद्या प्रसारक मंडळ ठाणेचे सेक्रेटरी श्री.अभय मराठे उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र सोनी यांनी या परिषदेचे अध्यक्षपद भूषवले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.अविनाश पवार व सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. सदर राष्ट्रीय परिषदेचे संयोजक म्हणून यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाचे प्रा.राहुल कुंडीया यांनी काम पाहिले.




दि.२४ एप्रिल २०२४ व ३ जून २०२४ रोजी महाविद्यालयातील यांत्रिक अभियांत्रिकी विभागाच्या वतीने Journal Club Activity चे आयोजन करण्यात आले. या विभागातील काही शिक्षकांनी यांत्रिक अभियांत्रिकीशी संबंधित असलेल्या जर्नल्समधे प्रकाशित झालेले पेपर्स इतरांसमोर सादर केले. या पेपर्समधील माहिती, संकल्पना यावर यावेळी सविस्तर चर्चा झाली.

दिनांक २७ एप्रिल २०२४ रोजी इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार विभाग आणि संस्थेच्या इनोव्हेशन कौन्सिल (IIC) द्वारे 'बौद्धिक संपदा अधिकार' (IPRs) वर ऑनलाईन कार्यशाळा Google Meet वर आयोजित करण्यात आली होती. डॉ.अजय ठाकूर, आयपीआरचे तज्ज्ञ या कार्यशाळेसाठी वक्ता म्हणून लाभले होते. डॉ. अजय ठाकूर यांनी आयपीआरचे प्रकार, शैक्षणिक आणि उद्योगातील त्यांचे महत्त्व, अंमलबजावणी आणि

भरणाऱ्या जखमा भरू द्याव्यात; त्याची खपली काढू नये !

अनुपालन यासह प्रमुख विषयांचा समावेश केला. संवादात्मक प्रश्नोत्तरांच्या सत्राने सत्राची सांगता झाली. एकंदरीत, बौद्धिक संपदा अधिकारांच्या महत्त्व याविषयी सहभागींना प्रशिक्षित करून आयपीआर संकल्पनांची सखोल माहिती मिळवून देण्याचे उद्दिष्ट साध्य करून ही कार्यशाळा यशस्वी ठरली.




दि.२८ जून २०२४ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाचे प्रा. योगेश काटदरे यांनी चिपळूण जवळील कनिष्ठ महाविद्यालय, अलोरे येथे अतिथी व्याख्यान पार पडले. विज्ञान शाखेतील बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी क्षेत्रातील करिअर संधींवर लक्ष केंद्रित करणे या व्याख्यानमालेचा उद्देश होता. विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील शैक्षणिक आणि करिअरच्या मार्गांबद्दल मार्गदर्शन करणे आणि प्रेरणा देणे हा हेतू होता. त्यांच्या सादरीकरणाचा विषय अभियांत्रिकी क्षेत्रात उपलब्ध असलेल्या विविध करिअरच्या संधींवर आधारित होता. प्रा. काटदरे यांनी एचएससी बोर्ड परीक्षा आणि एमएचटी-सीईटी परीक्षेचे महत्त्व अभियांत्रिकी पदवी मिळवण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल म्हणून सांगितले. या परीक्षांचे महत्त्व समजावून सांगताना, त्यांनी नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित या विषयातील चांगली कामगिरी कशी महत्त्वाची आहे यावर प्रकाश टाकला. व्याख्याना दरम्यान, प्रा.काटदरे यांनी या मुख्य विषयांसाठी प्रभावी अभ्यास तंत्राची अंतर्दृष्टी देण्यासाठी विद्यार्थ्यांना संवादात्मक चर्चेत गुंतवून ठेवले. त्यांच्या शंका आणि समस्यांचे निराकरण करून, त्यांनी त्यांना शैक्षणिकदृष्ट्या उत्कृष्ट बनविण्यासाठी आणि स्पर्धात्मक प्रवेश परीक्षांसाठी प्रभावीपणे तयारी करण्यासाठी व्यावहारिक धोरणांसह सुसज्ज करण्याचे उद्दिष्ट ठेवले.



दि.०३ जुलै २०२४ रोजी विद्युत अभियांत्रिकी विभागातील प्रा. योगेश काटदरे यांनी चिपळूण जवळील कनिष्ठ महाविद्यालय शिरगाव येथील बारावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना अतिथी व्याख्यान दिले. ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या या विद्यार्थ्यांना बारावी पूर्ण केल्यानंतर अभियांत्रिकीमध्ये यशस्वीरित्या करिअर करण्यासाठी मार्गदर्शन करण्यावर या व्याख्यानाचा भर होता. प्रा. काटदरे यांनी बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेचे महत्त्व आणि भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित या विषयात चांगले गुण मिळवणे का आवश्यक आहे हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. हे विषय अभियांत्रिकी शिक्षणाचा पाया बनवतात आणि नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत.



●●●

Posting under the Reg No MH/MR/TNC 27/2004 2006


Vidya Prasarak Mandal's

# College of Engineering, Thane




## Courses Offered

- Automation and Robotics
- Computer Engineering
- Electrical Engineering
- Electronics & Telecommunication Engineering
- Information Technology

## Why VPMCOE?

- Experienced Faculty
- Robust Curriculum
- Adequate Infrastructure
- Well Equipped Laboratories
- Industry Collaboration
- Research Opportunities
- Student Support Services
- Entrepreneurship & Innovation
- Industry Exposure

**Vidya Prasarak Mandal's College of Engineering, Thane**
'Jnanadweepa' Bldg No.1, Thane College Campus, Thane (W) 400 601
◈Approved By AICTE, New Delhi ◈Affiliated to University of Mumbai
Tel No: +91 - 9619651156
E-mail : vpmcoethane@vpmthane.org


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.